


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026
शुक्रवार, दि. १९ डिसेंबर २०२५




मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०३४ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com

# माणिकराव कोकाटेंच्या जागी कुणाला संधी द्यायची?

## मराठा प्रतिनिधी की इच्छुकाला बाशिंग; दादांची लागणार कसोटी, उलथापालथ अटळ

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

बनावट कागदपत्रांच्या आधारे शासकीय कोट्यातील सदनिका बळकावल्याप्रकरणी न्यायालयाने दोन वर्षांची कारावासाची शिक्षा सुनावलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी मंत्री माणिकराव कोकाटे यांना अखेर आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला आहे. राज्याचे क्रीडामंत्री म्हणून कार्यरत असलेले कोकाटे मंत्रिपदावरून पायउतार झाले. याआधी कृषीमंत्रीपदावरून त्यांची उचलबांगडी झाली होती. त्यामुळे एका कार्यकाळात दुसऱ्यांदा वादात अडकल्याने कोकाटेंना थेट मंत्रिपदच गमवावे लागल्याने राज्याच्या राजकारणात खळबळ उडाली आहे. न्यायालयीन निकालामुळे त्यांच्या प्रतिमेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, सत्ताधारी युतीवरही याचे पडसाद उमटताना दिसत आहेत.

राजकीय वर्तुळातील माहितीनुसार, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि उपमुख्यमंत्री अजित पवार कोकाटेंचा तात्काळ राजीनामा घेण्याच्या बाजूने नव्हते. उच्च न्यायालयात अपील होईपर्यंत थांबावे, अशी त्यांची भूमिका होती. मात्र, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कोकाटेंसारख्या दोषी ठरलेल्या आणि कलंकित नेत्याला मंत्रिमंडळात ठेवण्यास स्पष्ट विरोध दर्शवला. सरकारची नैतिकता आणि प्रतिमा जपण्यासाठी हा निर्णय आवश्यक असल्याचे फडणवीसांनी ठामपणे मांडल्याचे समजते. त्यामुळे अजित पवार यांचा नाईलाज झाला आणि अखेर कोकाटेंना राजीनामा द्यावा लागला. या घडामोडीमुळे सत्ताधारी महायुतीतील अंतर्गत समन्वय आणि दबावाचे राजकारण पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. कोकाटेंच्या राजीनाम्यानंतर रिक्त झालेल्या मंत्रिपदावर कोणाची वर्णी लागणार, याबाबत तर्कवितर्कांना उधाण आले आहे. अलीकडेच धनंजय मुंडे यांनी दिल्ली गाठून केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतल्याने त्यांच्या पुनरागमनाच्या चर्चा



रंगू लागल्या होत्या. त्यामुळे कोकाटेंच्या जागी मुंडेंना पुन्हा मंत्रिमंडळात संधी मिळू शकते, असे संकेत दिले जात होते. मात्र, वाल्मिक कराड प्रकरणाशी संबंधित कनेक्शनमुळे मुंडेंचे पुनरागमन सोपे नसल्याचेही स्पष्ट केले जात आहे. तरीही सध्या उपलब्ध पर्यायांमध्ये धनंजय मुंडे हे सर्वाधिक प्रबळ दावेदार मानले जात आहेत. दुसरीकडे, अजित पवार ऐनवेळी जातीय आणि राजकीय समीकरणांचा विचार करून वेगळा निर्णय घेऊ शकतात, अशी शक्यता देखील नाकारता येत नाही.

सूत्रांच्या माहितीनुसार, कोकाटेंच्या जागी नव्या मंत्र्याची नेमणूक तात्काळ होणार नसून, जिल्हा परिषद आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका संपल्यानंतरच हा निर्णय घेतला जाईल. तोपर्यंत क्रीडा व अल्पसंख्याक खात्यांचा कार्यभार स्वतः अजित पवारांकडेच राहणार आहे. मंत्रिपदाच्या वाटपात प्रादेशिक आणि जातीय संतुलन साधण्याचा प्रयत्न केला जाण्याची शक्यता असून, त्यामुळे निवडीची प्रक्रिया अधिक गुंतागुंतीची ठरणार आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कोणताही निर्णय घेताना राजकीय नुकसान होऊ नये, याची विशेष काळजी घेतली जात असल्याचे दिसते.

### मराठा समाजातून नवा प्रतिनिधी की इच्छुकाला संधी

दरम्यान, मंत्रिपदासाठी इच्छूक असलेल्या नेत्यांमध्ये अनिल पाटील, धनंजय मुंडे आणि संजय बनसोडे यांची नावे पुढे येत आहेत. याशिवाय, मंत्रिमंडळात नव्या चेहऱ्याला संधी दिली जाईल का, यावरही चर्चा सुरु आहे. मराठा समाजातून नवा प्रतिनिधी देण्याचा विचार झाला, तर प्रकाश सोळंखे, संग्राम जगताप आणि सुनील शेळके यांची नावे चर्चेत आहेत. त्यामुळे कोकाटेंच्या राजीनाम्यानंतर केवळ एक मंत्रिपद रिक्त झाले नसून, अजित पवारांसमोर राजकीय तोल सांभाळण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. आता या रिक्त जागेसाठी कोणता चेहरा निवडला जातो, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहिले आहे.

## थोडक्यात...

### MH03FB नवीन नोंदणी मालिका सुरु

**मुंबई (समर्थ गांवकरी) : मुंबई (पूर्व) प्रादेशिक परिवहन कार्यालयात परिवहन संवर्गातील चारचाकी वाहनांच्या नोंदणीसाठी नवीन MH03FB ही मालिका लवकरच सुरु करण्यात येणार आहे. सध्या वापरात असलेली MH03ES मालिका संपत आल्याने ही नवीन मालिका 22 डिसेंबर 2025 पासून लागू होणार आहे. या नव्या मालिकेतून आकर्षक किंवा पसंतीचा नोंदणी क्रमांक आरक्षित करू इच्छिणाऱ्या वाहनधारकांनी विहीत नमुन्यातील अर्ज सादर करावा. अर्जासोबत पत्त्याचा पुरावा, ओळखपत्र, पॅन कार्ड तसेच पसंतीच्या क्रमांकासाठीची विहित फी राष्ट्रीयकृत बँकेच्या धनाकर्षासह Regional Transport Office, Mumbai (East) किंवा RTO, Mumbai (East) यांच्या नावे काढून 24 डिसेंबर 2025 रोजी दुपारी 2 वाजेपर्यंत अर्ज सादर करणे आवश्यक आहे.**

### 1,000 कोटी रुपयांचे रोखे विक्रीस

**मुंबई (समर्थ गांवकरी) : महाराष्ट्र शासनाच्या 15 वर्षे मुदतीच्या 1,000 कोटींच्या रोख्यांची विक्री शासनाच्या सुधारित अधिसूचनेतील अटी आणि शर्तींच्या अधीन राहून करण्यात येईल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकास कामासाठी अर्थपुरवठा करण्यासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाच्या सचिव शैला ए. यांनी पत्रकान्वये दिली आहे. अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) एकूण अधिसूचित केलेल्या शासन कर्जरोखे रकमेच्या दहा टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणुकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र एका गुंतवणुकदारास एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीतजास्त एक टक्का रकमेच्या मर्यादेपर्यंत वाटप करण्यात येईल.**

# शिवनेरीचा टोल भरण्यासाठी प्रवाशांनी काढली वर्गणी

## प्रशासनाच्या निष्काळजीपणाचा फटका, उर्से टोलनाक्यावरील प्रकार

**तळेगाव दाभाडे : (समर्थ गांवकरी)**

तिकीट काढून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना सुरक्षित व सुरळीत सेवा देण्याची जबाबदारी ज्यांची, त्यांच्याच निष्काळजीपणामुळे प्रवाशांवर टोल भरण्यासाठी वर्गणी काढण्याची वेळ आली. ई-शिवनेरी बसच्या फास्टटॅग खात्यात शिल्लक नसल्याने बुधवारी (दि. १७) रात्री तळेगाव दाभाडेजवळील उर्से टोलनाक्यावर बस सुमारे तासभर थांबवून ठेवण्यात आली. या प्रकाराने प्रशासनाच्या कारभारावर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

दादरहून पुण्याकडे जाणारी ई-शिवनेरी बस रात्री साडेनऊच्या सुमारास उर्से टोलनाक्यावर पोहोचली असता फास्टटॅग रिचार्ज नसल्याचा



प्रकार उघडकीस आला. टोल कर्मचारी टोल भरल्याशिवाय बस पुढे नेण्यास तयार नसल्याने बस जागेवरच अडकली. प्रवाशांनी वारंवार विचारणा करूनही डेपो व्यवस्थापनाशी संपर्क होऊ शकला नाही.

अखेर प्रवाशांनीच पैसे जमा करून टोल भरला आणि प्रशासनाच्या अपयशाची जबाबदारी स्वतःच्या खिशातून उचलली. विशेष म्हणजे बसमध्ये गर्भवती महिला व वृद्ध प्रवासी असल्याने दीर्घ प्रतीक्षेमुळे त्यांना मोठा मानसिक व शारीरिक त्रास सहन करावा लागला. "तिकीट आम्ही भरतो, पण बसचा फास्टटॅग रिचार्ज ठेवण्याची जबाबदारी कोणाची? प्रशासन झोपेत असताना प्रवाशांनी वर्गणी काढून व्यवस्था सांभाळावी, ही गंभीर बाब आहे," अशी संतप्त प्रतिक्रिया प्रवाशांनी व्यक्त केली. या घटनेमुळे सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतील बेफिकिरी उघड झाली असून, संबंधितांवर कारवाई करून भविष्यात असे प्रकार घडू नयेत, अशी जोरदार मागणी करण्यात येत आहे.

# युतीचा सर्वाधिक लाभ नेमक्या कोणत्या पक्षाच्या पारड्यात पडणार?

**कल्याण: (समर्थ गांवकरी)**

कल्याण-डोंबिवली महापालिकेत १९९५ पासून २०२०पर्यंत शिवसेना भाजपची सत्ता आहे. यापूर्वी -दोनवेळा युती करून, तर दोनवेळा स्वतंत्रपणे शिवसेना - भाजपने निवडणुका लढवल्या. यावेळी महायुती करून निवडणूक लढवण्याचे संकेत दोन्ही पक्षांनी दिल्याने या निवडणुकीत युतीत सर्वाधिक लाभ शिवसेनेला होणार की, भाजपला, याकडे लक्ष लागले आहे. निवडणुकीच्या तोंडावर शिंदेसेना आणि भाजपने एकमेकांच्या पक्षातील माजी नगरसेवक गळाला लावले. त्यातून त्यांनी त्यांच्या पक्षातील पॅनल सुरक्षित केली. यानंतर दिल्लीतून युतीचा आदेश आला. त्यामुळे ही युती कुणाला फलदायी ठरते, ते निकालानंतर समजेल. महापालिकेची




यापूर्वीची निवडणूक २०१५ मध्ये झाली. तिचा कालावधी २०२० मध्ये संपुष्टात आला. पण कोरोनामुळे महापालिकेची निवडणूक पार पडली नाही. २०२०पासून महापालिकेत प्रशासकीय राजवट होती. निवडणुकीमुळे प्रशासकीय राजवट संपुष्टात येणार आहे. प्रगतीपथावरील काही प्रकल्प मार्गी लागत नाहीत तोपर्यंत वाहतूक कोंडीतून सुटका नाही. प्रदूषणाचा प्रश्न गंभीर आहे.

# महायुती, महाआघाडीची एकजूट कठीण!

**चंद्रपूर : (समर्थ गांवकरी)**

चंद्रपूर चंद्रपूरात भाजपचे ज्येष्ठ नेते आमदार सुधीर मुनगंटीवार आणि आमदार किशोर जोरगेवार यांच्यात विस्तव जात नाही. काँग्रेस नेते आमदार विजय वडेट्टीवार आणि खासदार प्रतिभा धानोरकर यांच्यात एकवाक्यता दिसत असली तरी स्थानिक कार्यकर्त्यांत ती नाही त्यामुळे प्रामुख्याने भाजप विरुद्ध काँग्रेस अशी लढत होत असलेल्या या पालीकेत. या तीन 'वार' आणि एका "कर'ची राजकीय कसोटी ठरणार आहे. चंद्रपूर महानगरपालिकेत संगिता अमृतकर यांचा रूपाने काँग्रेसला पहिल्या महापौर मिळाल्या. मात्र अतंर्गत गटबाजीने काँग्रेसला खिळखिळे केले. २०१७ च्या मनपा निवडणुकीत भाजपने आ. मुनगंटीवार यांच्या नेतृत्वात झेंडा फडकाविला असला तरी आता ही निवडणूक मात्र भाजप व काँग्रेससाठीही




सहज सोपी दिसत नाही. जी गटबाजी काँग्रेसमध्ये होती. ती यावेळी भाजपत दिसत आहे. काँग्रेसमध्येही सत्तासंघर्ष तीव्र असल्याने महायुती- महाआघाडीत फाटाफूट दिसत आहे. दूसरीकडे बसपा, शिवसेना, राष्ट्रवादी, मनसे याची भूमिका निर्णायक असल्याने चुरस वाढली आहे.

# काँग्रेसला 'हात' दाखवत प्रज्ञा सातव भाजपमध्ये!

## पुन्हा विधान परिषदेवर जाण्याची शक्यता

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

काँग्रेस पक्ष आणि विधान परिषद सदस्यत्वाचा राजीनामा देत प्रज्ञा राजीव सातव यांनी समर्थकांसह गुरुवारी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत येथे भाजपमध्ये प्रवेश केला. विधान परिषदेतील काँग्रेसचे संख्याबळ एकने कमी झाल्याने विरोधी पक्षनेतेपदावरील काँग्रेसच्या दाव्याला धक्का बसला आहे.

काँग्रेसचे विधान परिषदेत सहा आमदार उरले असून, शिक्षक आमदार सुधाकर अडबाले हे काँग्रेसचे सहयोगी सदस्य आहेत. उद्धवसेनेचे पाच आमदार आहेत. काँग्रेसच्या आणखी एका विधान परिषद सदस्याला भाजपमध्ये घेण्याच्या हालचाली सुरू असल्याची खात्रीलायक माहिती सूत्रांनी दिली. तसे झाले तर अनिल परब यांना विरोधी पक्षनेते करण्याचा आग्रह उद्धवसेनेकडून धरला जाण्याची शक्यता आहे.

सोलापूर दक्षिणचे माजी आमदार दिलीप माने यांनी यावेळी समर्थकांसह भाजपमध्ये प्रवेश केला. निष्ठेने काम करून भाजपचा विचार तळागाळात पोहोचवू, असे माने यावेळी म्हणाले. माजी मंत्री कृपाशंकरसिंह, आ. सचिन कल्याणशेट्टी आदी यावेळी उपस्थित होते. सातव यांनी विधिमंडळाचे सचिव जितेंद्र भोळे यांना भेटून विधान परिषद सदस्यपदाचा राजीनामा दिला. त्यांच्या आमदारकीचा कार्यकाळ पूर्ण व्हायला आणखी पाच वर्षे बाकी होती. विधानसभा सदस्यांमधून त्या विधान परिषदेवर निवडून गेल्या होत्या. आता भाजपने त्यांना विधान परिषदेवर घेण्याचा शब्द दिला




आहे, असे सूत्रांनी सांगितले.

पंतप्रधान मोदी आणि मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नेतृत्वामुळे प्रभावित होऊन आणि दिवंगत राजीव सातव यांचे हिंगोली जिल्हा विकासाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी भाजपमध्ये प्रवेश केला, असे सातव यांनी भाजप कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात सांगितले.

# महापालिका निवडणुकीत एकनाथ शिंदेंना मोठा धक्का

## शिंदेसेनेच्या पदाधिकाऱ्यांचा सामूहिक राजीनामा

**रायगड : (समर्थ गांवकरी)**

राज्यात महापालिका निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे. त्यात इच्छुक उमेदवारांच्या फोडाफोडीपासून पक्षप्रवेशापर्यंत सत्ताधारी भाजपा आणि शिंदेसेनेत चढाओढ सुरू आहे. मात्र रायगड जिल्ह्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिंदेसेनेला मोठा धक्का बसला आहे. याठिकाणी उरण विधानसभा जिल्हाप्रमुख अतुल भगत यांना पदावरून हटवून विनोद साबळे यांची जिल्हाप्रमुखपदी नियुक्ती केली. त्यामुळे उरण येथे शिंदेसेना पदाधिकाऱ्यांमध्ये असंतोष पसरला आहे. अतुल भगत यांना पदावरून हटवल्याने उरण तालुकाप्रमुख दीपक ठाकरे, पनवेल तालुकाप्रमुख रघुनाथ पाटील यांच्यासह जवळपास ३३ पदाधिकाऱ्यांनी सामूहिक राजीनामे पक्षाच्या सचिवांकडे पाठवले आहेत. नुकतीच उरण येथे नगर परिषदेची निवडणूक झाली. या निवडणुकीत महायुतीत न लढाता भाजपा आणि शिंदेसेना वेगवेगळी मैदानात उतरली होती. यावेळी प्रचारात दोघांनी एकमेकांवर आरोप प्रत्यारोप केले. मात्र याच निवडणुकीमुळे शिंदेसेनेतील पक्षातंर्गत वाद चव्हाट्यावर आले.




पक्षवाढीसाठी मेहनत घेणाऱ्या पदाधिकाऱ्यांना डावलून बाहेरून आलेल्यांना नियुक्ती केल्याचा आरोप पदाधिकाऱ्यांनी केला आहे. त्याशिवाय आमदार महेंद्र थोरवे यांच्यावर मनमानी आणि एकाधिकारशाही केल्याचा आरोप राजीनामा दिलेले पदाधिकारी करत आहेत. थोरवे यांनी विनोद साबळे यांची उरण मतदारसंघाच्या प्रभारी जिल्हाप्रमुखपदी नियुक्ती केली. त्यामुळे इथल्या पदाधिकाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली.

# दिव्यांग व्यक्तींच्या विवाहास शासनाचे प्रोत्साहन

**मुंबई: (समर्थ गांवकरी)**

दिव्यांग अव्यंग विवाह प्रोत्साहन योजनेत महत्त्वपूर्ण सुधारणा करण्यात आल्या असून, अनुदानाच्या रकमेत वाढ करून योजना अधिक प्रभावी करण्यात आली असल्याचे दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी सांगितले. समाजात दिव्यांग व्यक्तींच्या विवाहाबाबत असलेले सामाजिक व सांस्कृतिक पूर्वग्रह त्यांच्या आयुष्यावर दीर्घकालीन परिणाम करणारे ठरतात. दिव्यांगत्वाकडे अनेकदा असमर्थता किंवा अधिकारहीनता म्हणून पाहिले जाते. या पार्श्वभूमीवर हा दृष्टिकोन बदलणे आवश्यक असल्याचे अधोरेखित करत, दिव्यांग व्यक्तींच्या विवाहाला प्रोत्साहन देण्यासाठी हा महत्त्वाचा निर्णय शासनाने घेतला आहे.

### योजनेच्या प्रमुख अटी

वधू अथवा वर दिव्यांग व्यक्ती अधिनियमाप्रमाणे किमान ४०% अथवा त्यापेक्षा जास्त दिव्यांगत्वाचे आधारसंलग्न वैध वैश्विक ओळखपत्र (यूडीआयडी) धारण आवश्यक आहे. दिव्यांग वधू किंवा वर यापैकी एक महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. विवाहित वधू व वराचा प्रथम विवाह असावा तसेच वधू अथवा वर घटस्फोटीत असल्यास अशा प्रकारची मदत यापूर्वी घेतलेली नसावी.

सचिव मुंढे म्हणाले, दिव्यांग व्यक्तीचा विवाह ही पालकांच्या दृष्टीने जिकिरीची जबाबदारी बनते. अनेकदा विवाह टाळला जातो किंवा विजोड जोडीदार दिला जातो. विशेषतः दिव्यांग महिलांना महिला आणि दिव्यांग अशा दुहेरी भेदभावाला सामोरे जावे लागते. या पार्श्वभूमीवर शासन, सामाजिक व स्वयंसेवी संस्था दिव्यांग व्यक्तींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

दिव्यांग–अव्यंग विवाह प्रोत्साहन अनुदान योजनेत वाढ करण्यासह दिव्यांग–दिव्यांग विवाह हा नवा घटक समाविष्ट करण्यात आला आहे. नव्या सुधारित योजनेनुसार दिव्यांग–अव्यंग विवाहासाठी रुपये १,५०,००० तर दिव्यांग–दिव्यांग विवाहासाठी रुपये २,५०,००० इतके अनुदान मिळणार आहे.

# मुखेडच्या सर्वांगिण विकासासाठी सरकार पाठीशी

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

मुखेड : (समर्थ गांवकरी)

मागच्या निवडणूकीत थोड्या मताने नगराध्यक्षपद आपल्या हातातून गेले त्यामुळे पाच वर्ष आपल्या शहराचा विकास होवू शकला नाही. तेंव्हा मुखेडच्या मतदारांनी आपल्या शहराच्या विकासासाठी भाजपाचे सर्व नगरसेवक व नगराध्यक्ष पदाचे उमेदवार सौ.विजया राम पत्तेवार यांना विजयी करा पुढील पाच वर्षात मुखेडला निधी कमी पडू देणार नाही असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. ते आज मुखेड नगर परिषदेच्या होत असलेल्या निवडणूक प्रचारात बोलत होते. व्यासपीठावर माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण,आ. जितेश अंतापूरकर,माजी




आ.अमर राजुरकर,जिल्हाध्यक्ष संतुकराव हंबर्डे,पुनमताई पवार, दिलीप कंदकुर्ते, संगटनमंत्री संजय कौडगे, देविदासभाऊ राठोड, अनिताताई चोंडिकर आदिंची उपस्थिती होती.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की,हा देवाभाऊ असे पर्यंत लाडकी बहिण योजना बंद पडणार नाही. आता आपण लखपती दिदी ही योजना आणली आहे. आ.तुषार राठोड यांनी लाडक्या बहिणींना आता लखपती दिदी करा कारण मी जेंव्हा पुढच्या वर्षी येईन तेंव्हा एक लाख लखपती दिदी झाल्या पाहिजेत. मुखेडच्या आजूबाजूचा परिसर नगर पालिकेच्या अंतर्गत येत नसल्यामुळे त्या वस्त्यांचा विकास करता येत नाही,पुढील काळात हद्दवाढ करुन हा भाग मुखेड शहराला जोडू व विकास कामे करण्यासाठी जास्तीचा निधी उपलब्ध करुन देवू. पुढील काळात 63 कोटीची पाणी पुरवठा योजना मंजुर करु. शहराच्या भूमिगत गटार योजनेचा 108 कोटीचा प्रस्ताव आ.डॉ.तुषार राठोड यांनी सादर केला आहे तो मंजूर करु. येथील स्थलांतर रोखण्यासाठी व उद्योगधंद्याची वाढ होण्यासाठी एमआयडीसीची जुनी मागणी आहे ती पुर्ण करु. शहरातील रस्ते,विज,पाणी इत्यादी योजनेसाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही. बोधन-मुखेड-लातूर या रेल्वे मार्गाचे सव्हेक्षण करण्यासाठी राज्यशासनाचा वाटा उचलू व हा मार्ग सर्वेक्षण पुर्ण करण्यासाठी प्रयत्न करु.मुखेड मार्केट कमेटीसाठी जादा जागेची मागणी करण्यात आली आहे ती मागणी पुर्ण करु. लेंडी प्रकल्पाला आजपर्यंत भरपूर निधी दिला आहे पुढील काळातही विस्थापितांच्या प्रश्नांना प्राधान्य देवून आगामी काळात होणाया मार्च महिण्याच्या बजेट अधिवेशनात निधीची तरतूद करु असे आश्वासन मुखमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांनी दिले. प्रास्ताविकात आ.डॉ.तुषार राठोड यांनी मुखेड शहर व तालुक्याच्या मागण्या मांडून मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले. माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनी येथील मतदार आजपर्यंत भाजपाच्या पाठीशी राहिला आहे,या निवडणूकीत सुध्दा भाजपच्या सर्व उमेदवारांना ते विजयी करतील असे म्हणाले.

यावेळी प्रवीण साले, गौतम काळे, नासर पठाण, सदाशिव पाटील जाधव, विलास कोडगिरे, शिवाजी गेडेवाड, संतोष बोनलेवाड, गणपत गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले.

# स्वदेशी सर्जिकल रोबोट एसएसआय मंत्रासाठी एफडीए ५१०(के) अर्ज दाखल

पुणे : (समर्थ गांवकरी)

भारतातील स्वदेशी सर्जिकल रोबोटिक्स क्षेत्रातील अग्रणी कंपनी एसएस इनोवेशन्स इंटरनॅशनल, आयएनसी. (नॅस्डॅक: एसएसआयआयआय) ने आज एक ऐतिहासिक टप्पा गाठल्याची घोषणा केली. कंपनीने आपल्या नेक्स्ट-जनरेशन एसएसआय मंत्रा सर्जिकल रोबोटिक सिस्टीमसाठी अमेरिकेच्या अन्न व औषध प्रशासनाकडे (एफडीए) ५१०(के) प्रीमार्केट नोटिफिकेशन सादर केले आहे. हे सबमिशन ५ डिसेंबर २०२५ रोजी पूर्ण झाले असून, यामध्ये जनरल सर्जरी, युरोलॉजी, कोलोरेक्टल, गायनॅकोलॉजी आणि कार्डियक अशा उच्च मागणी असलेल्या शस्त्रक्रिया विशेषतांचा समावेश आहे.

हा टप्पा भारतीय विकसित सर्जिकल रोबोटिक प्लॅटफॉर्मने



उचललेला आतापर्यंतचा सर्वात महत्त्वाचा जागतिक नियामक टप्पा मानला जात असून, दीर्घकाळ आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या वर्चस्वाखाली असलेल्या या क्षेत्रात भारताला ठळक स्थान मिळवून देणारा आहे.

एसएस इनोवेशन्सचे संस्थापक, अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुधीर श्रीवास्तव म्हणाले, "एफडीएकडे ५१०(के) नोटिफिकेशन सादर करणे हे केवळ एसएस इनोवेशन्ससाठीच नव्हे, तर प्रगत वैद्यकीय तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भारताच्या जागतिक नेतृत्वाच्या उदयासाठीही एक निर्णायक क्षण आहे. एसएसआय मंत्रा ही प्रणाली परवडणारी, सुलभ आणि तांत्रिकदृष्ट्या वेगळी असावी या उद्देशाने विकसित करण्यात आली आहे. विविध भौगोलिक भागांतील तिची सिद्ध कामगिरी तिच्या क्षमतेची साक्ष देते. विशेषतः वंचित समुदायांना सेवा देणाऱ्या रुग्णालयांना जागतिक दर्जाचा आणि किफायतशीर असा पर्याय यामुळे मोठ्या प्रमाणावर लाभदायक ठरेल, असा आम्हाला विश्वास आहे."

एफडीएसोबत झालेल्या प्री-सबमिशन बैठका आणि सविस्तर चर्चेनंतर, कंपनीने डी नोवो अर्जाऐवजी ५१०(के) मार्ग स्वीकारण्याचा निर्णय घेतला, ज्यामुळे तुलनेने जलद आणि कार्यक्षम मंजुरी प्रक्रियेचा लाभ मिळू शकतो.



# फिजा सय्यद हिला सुवर्णपदक

अकोले : (समर्थ गांवकरी)

४७ वी वरिष्ठ राष्ट्रीय सॉफ्टबॉल स्पर्धेत अकोलेची कन्या आंतरराष्ट्रीय खेळाडू फिजा सय्यद हिने सुवर्णपदक पटकावले आहे. १४ ते १८ डिसेंबर २०२५ पासून पश्चिम बंगालमधील दत्तापुलिया येथे वरिष्ठ राष्ट्रीय सॉफ्टबॉल आयोजित केली आहे. या स्पर्धेचे आयोजन सॉफ्टबॉल असोसिएशन ऑफ इंडिया आणि पश्चिम बंगाल सॉफ्टबॉल असोसिएशन यांनी केले आहे. या स्पर्धेत देशभरातील अनेक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पुरुष आणि महिला खेळाडू त्यांची ताकद, कौशल्य आणि सांघिक भावना दाखवतात. या स्पर्धेत फिजा सय्यद हिने उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक मिळवले आहे. फिजा सय्यद ही नगर जिल्ह्यातील दुर्गम डोंगराळ व आदिवासी तालुक्यातील कन्या असून अनेक आंतरराष्ट्रीय सामन्यात तिने भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. सन 2013 पासून सॉफ्टबॉल या खेळामध्ये सातत्याने सहभाग असून तालुकास्तरापासून आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत विविध स्पर्धांमध्ये यशस्वीरित्या सहभाग घेतला आहे. सन 2017 मध्ये 24 वी सीनियर महाराष्ट्र सॉफ्टबॉल चॅम्पियनशिप स्पर्धा मुंबई सिटी सॉफ्टवेअर असोसिएशन मुंबई या स्पर्धेमध्ये रनरअप मिळाले. सन 2018 मध्ये 24 वी जूनियर नॅशनल महाराष्ट्र राज्य सॉफ्ट बॉल चॅम्पियनशिप स्पर्धा औरंगाबाद येथे संपन्न झालेल्या स्पर्धेमध्ये कास्य पदक मिळाले. सन 2018 - 2019 मध्ये 36 वी जूनियर नॅशनल सॉफ्टबॉल चॅम्पियनशिप स्पर्धा चित्तूर (आंध्र प्रदेश) मध्ये संपन्न झाली. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्र संघाला सुवर्णपदक मिळवून देण्यात मोठा वाटा होता. सन 2018 मध्ये इंडियन टीम ऑफ अंडर 19 मध्ये सातव्या एशियन ज्युनिअर वूमन सॉफ्टबॉल चॅम्पियनशिप क्लार्क फिलिपिन्स येथे झालेल्या स्पर्धेमध्ये भारतीय संघाकडून उत्कृष्ट प्रदर्शन केले. 14 डिसेंबर ते 17 डिसेंबर 2022 मध्ये एशियन वुमन युनिव्हर्सिटी सॉफ्टबॉल चॅम्पियनशिप, पटाया, थायलंड येथे भारतीय संघाकडून उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. आजपर्यंत क्रीडा सामाजिक राजकीय शैक्षणिक राष्ट्रीय राज्यस्तरीय जिल्हास्तरीय क्षेत्रामध्ये अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. यावर्षीचा जिल्हा क्रीडा पुरस्कार तिला पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते मिळाला आहे.

# 'आचार संहिता, संकेतांची पायमल्ली

पुणे: (समर्थ गांवकरी)

विकासाच्या नावाने सतत धूळफेक करणाऱ्या राज्यातील महायुती सरकार'ने निवडणूक आयोगावर दबाव आणून, सरकारच्या विकास कामांच्या कोट्यावधींच्या तथाकथित घोषणा करेपर्यंत.. जाणीवपूर्वक 'निवडणुक घोषणा' लांबवली व प्रशासकीय यंत्रणेद्वारे सरकारी खर्चाने कार्यक्रम करवुन घेऊन, राज्यातील 'मनपा निवडणुक' जाहीर करण्याचे कारस्थान हे सत्ताधारी महायुतीच्या दबावाखाली निवडणूक आयोग करत असल्याचे पुन्हा सिध्द झाले असल्याचा आरोप कॉंग्रेस'चे वरिष्ठ प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी केला असून निवडणुक आचार संहिता, नैतिक मुल्ये व संकेतांची युती सरकार व आयोगा कडून एकत्रितपणे पायमल्ली होत असल्याची घणाघाती टिका केली.

# धमाल मनोरंजक 'गोट्या गँगस्टर'चा ट्रेलर लॉंच

**२६ डिसेंबरला चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला**

पुणे : (समर्थ गांवकरी)

राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त दिग्दर्शक दिवंगत राजेश पिंजानी यांचा अखेरचा चित्रपट 'गोट्या गँगस्टर' या चित्रपटाचा ट्रेलर लॉंच करण्यात आला आहे. मुंबईतल्या चाळीत राहणाऱ्या गोट्या नावाचा तरूण आणि त्याचे मित्र गँग तयार करण्याचा प्रयत्न करतात, त्यानंतर त्यांच्या आयुष्यात काय धमाल होते याची रंजक गोष्ट या चित्रपटात पहायला मिळणार असून, २६ डिसेंबर रोजी हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. अन्नपूर्णा प्रॉडक्शन्स निर्मित 'गोट्या गँगस्टर' या चित्रपटाची निर्मिती अन्नपूर्णा बिरादार, राजेश्री बिरादार, संदीप बिरादार आहेत, तर चित्रपटाची प्रस्तुती ऋतुजा पाटील व शिव




लोखंडे यांनी केली आहे. राजेश पिंजानी यांनी लेखन दिग्दर्शन केलेल्या या चित्रपटात उत्तम स्टारकास्ट पाहायला मिळणार आहे. प्रवीण तरडे, प्रथमेश परब, डॉ. मोहन आगाशे, श्रीकांत यादव, अश्विनी गिरी, भूषण मंजुळे, विनोद वणवे, ऐश्वर्या शिंदे, मुकूंद वसुले यांच्या या चित्रपटात प्रमुख भूमिका आहेत.

मायानगरी मुंबईतील एका चाळीत राहणाऱ्या तीन मित्रांची गोष्ट गोट्या गँगस्टर या चित्रपटांतून उलगडणार आहे. आयुष्यात घडणाऱ्या काही घटनांमुळे त्या तिघांवर किडनॅपिंग करण्याची वेळ येते. त्या दरम्यान, काही वर्षांपूर्वी मुंबई सोडून थेट दुबईला पळून गेलेला डॉन चिमण भाई अचानक मुंबईत परततो. त्यानंतर विनोदी प्रसंग, भन्नाट संवाद आणि न संपणारी धमाल या चित्रपटात पहायला मिळणार आहे. अत्यंत खुसखुशीत गोष्ट, उत्तम अभिनेत्यांची फौज या चित्रपटात आहे. या कथानकाविषयीची उत्सुकता ट्रेलरमधून वाढली आहे.

'बाबू बँड बाजा' या राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त चित्रपटाचं दिग्दर्शन राजेश पिंजानी यांनी केलं होतं. पहिल्याच चित्रपटासाठी राष्ट्रीय पुरस्कार मिळवल्यानंतर त्यांच्याकडून आणखी उत्तमोत्तम चित्रपटांची अपेक्षा होती. त्यानंतर त्यांनी दिग्दर्शित केलेला 'गोट्या गँगस्टर' चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वीच त्यांचं अकाली निधन झालं. त्यामुळे आता राजेश पिंजानी यांचा हा शेवटचाच चित्रपट ठरला. आता गोट्या गँगस्टर आता २६ डिसेंबरला प्रदर्शित करून राजेश पिंजानी यांना श्रद्धांजली वाहण्यात आली आहे.

# मनीष रायते ठरला मुळशी केसरी २०२५चा मानकरी

**मुळशी केसरी कुस्ती स्पर्धा २०२५ : मुळशीच्या आखाड्यात ऐतिहासिक जल्लोष**

पुणे : (समर्थ गांवकरी)

मुळशी केसरी प्रतिष्ठानच्या वतीने सलग १८व्या वर्षी आयोजित करण्यात आलेली भव्य मुळशी केसरी कुस्ती स्पर्धा २०२५ मुळशी तालुक्यातील घोटवडे फाटा येथील सुंदरबन लॉनजवळ मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात पार पडली. या स्पर्धेमुळे मुळशी तालुक्यातील कुस्ती प्रेमींमध्ये नवचैतन्य संचारले असून संपूर्ण परिसर कुस्तीमय वातावरणाने भारावून गेला होता. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील नामांकित तसेच उदयोन्मुख मल्लांनी या स्पर्धेत सहभाग घेतला. मातीच्या आखाड्यात मल्लांनी सादर केलेली ताकद, चपळाई, तांत्रिक कौशल्य



आणि डावपेच पाहण्यासाठी हजारो कुस्तीप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. प्राथमिक फेऱ्यांपासून अंतिम लढतींपर्यंत प्रत्येक सामना अत्यंत चुरशीचा ठरला. मुळशी केसरी २०२५चा मानकरी मनीष रायते (इंदापूर) ठरला. अंतिम सामन्यात दमदार खेळ करत त्याने विजेतेपदावर आपले नाव कोरले. सागर देवकाते (इंदापूर) याने उपविजेतेपद पटकावले, तर अविनाश गावडे (इंदापूर) तृतीय आणि अभिजित भोईर (मुळशी) चतुर्थ क्रमांकावर राहिला. तसेच अमृता केसरीचा मानकरी भारत मदने (बारामती) ठरला, तर मुन्ना झुंजुरके (मुळशी) याने उपविजेतेपद मिळवले. या थरारक लढतींनी आखाड्यातील वातावरण कमालीचे रंगले. यावेळी सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना "मुळशीरत्न पुरस्कार २०२५" प्रदान करण्यात आला. यामध्ये सुमित–सुनीता कैलास दाभाडे, दर्शन दत्तात्रय काळभोर आणि पै. पृथ्वीराज राजेंद्र मोहोळ यांचा गौरव करण्यात आला. तसेच विद्यमान आमदार श्री. शंकरभाऊ मांडेकर यांचा मुळशी केसरीच्या वतीने विशेष सन्मान करण्यात आला. विजेत्या व उपविजेत्या मल्लांना आकर्षक रोख बक्षिसे, चषक, मानचिन्हे व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या नवोदित मल्लांचाही विशेष सत्कार करण्यात आला. या भव्य कार्यक्रमास आमदार शंकर मांडेकर, सह. पोलीस आयुक्त मनोज पाटील, माजी आमदार चंद्रकांत मोकाटे, हिंद केसरी अमोल चडे, रिपब्लिकन पक्षाच्या युवा आघाडीचे राज्य संघटक उमेश कांबळे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. उपस्थित मान्यवरांनी कुस्ती ही महाराष्ट्राची गौरवशाली परंपरा असून ग्रामीण भागातील तरुण मल्लांना प्रोत्साहन देण्यासाठी अशा स्पर्धा अत्यंत आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले.

# पुणे पोलिस आयुक्तांवर राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाचे ताशेरे

पुणे : (समर्थ गांवकरी)

पुणे शहर भाजप अध्यक्ष धीरज घाटे, मा नगरसेविका मनीषा घाटे यांच्याविरोधातील छळवणूक आणि गंभीर आरोपांच्या प्रकरणात राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाने पुणे पोलिस आयुक्तांची कानउघडणी केली आहे. संबंधित प्रकरणाचा सविस्तर अहवाल तातडीने सादर करण्याचे आदेश आयोगाने दिले असून, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या कारवाईमुळे पुणे भाजपच्या गोटात खळबळ उडाली आहे. दहशत माजवणे, भ्रष्टाचार, वीजचोरी आणि पुणे महापालिकेच्या मालमत्तेचा अनधिकृत ताबा अशा विविध प्रकरणांत भाजप शहराध्यक्ष धीरज घाटे वादग्रस्त ठरले आहेत.

# बाणगंगा पेपर इंडस्ट्रीजने सीएमजे ब्रेवरीजचे केले अधिग्रहण

पुणे : (समर्थ गांवकरी)

बाणगंगा पेपर इंडस्ट्रीज लि. (बीपीआयएल) च्या संचालक मंडळाने एक धाडसी धोरणात्मक निर्णय घेत १७ डिसेंबर, २०२५ रोजी झालेल्या बैठकीत सीएमजे ब्रेवरीज प्रायव्हेट लि.(सीएमजेबीपीएल) मधील ७८.९० टक्के इक्विटी हिस्सा अधिग्रहित करण्यास मान्यता दिली. यामध्ये प्रत्येकी १० रुपये दर्शनी मूल्याचे १०,९५,२२,०६७ इक्विटी शेअर्सचा समावेश आहे. यामुळे बीपीआयएलच्या अधिकृत भाग भांडवलात वाढ होईल.

दोन्ही कंपन्यांमध्ये झालेला करार बीपीआयएलच्या ईशान्य भारतातील भरभराटीच्या बिअर बाजारपेठेत वर्चस्व गाजवण्याची संधी देतो. भागधारक आणि स्टॉक एक्सचेंजच्या मंजुरीच्या अधीन राहून, हा व्यवहार दोन महिन्यांत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे.

मेघालयाच्या नयनरम्य परिसरात मुख्यालय असलेली





सीएमजे ब्रेवरीज ही ईशान्य भारतातील सर्वात मोठी बिअर उत्पादक कंपनी आहे, जी प्रीमियम बिअर उत्पादनासाठी ओळखली जाते. तिची अत्याधुनिक, उच्च-क्षमतेची उत्पादन सुविधा, जी अचूक जर्मन आणि युरोपियन यंत्रसामग्रीद्वारे चालविली जाते. अतुलनीय अशा प्रकारची कार्यक्षमता आणि गुणवत्ता कंपनी प्रदान करते, ज्यामुळे प्रादेशिक वाढ आणि नाविन्याला चालना मिळते.

भारतीय बिअरच्या बाजारपेठेत २०२४ मध्ये ४८३.१० अब्ज रुपयांची उलाढाल झाली आणि ती ९.९० टक्केच्या वार्षिक चक्रवाढ दराने (सीएजीआर) वाढून २०३४ पर्यंत १,२४१.६९ अब्ज रुपयांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. एक्सचेंजच्या घोषणेनुसार रोनक जैन आणि त्यांचे सहयोगी बीपीआयएलच्या १०० टक्के सार्वजनिक शेअर्ससाठी खुली ऑफर देतील.

# शेषेराव जाधव यांचे निधन

गेवराई : (समर्थ गांवकरी)

तालुक्यातील पाथरवाला (बुद्रुक) येथे दुःखाची लाव्हा लागली आहे. श्री शेषेराव रामराव जाधव (वय ८५), एक प्रिय व प्रतिष्ठित, सांप्रदायिक व्यक्ती, वयोवृद्धत्वामुळे रात्री १ वाजता स्वर्गवासी झाले. त्यांचे अंत्यसंस्कार सकाळी ११:३० वाजता पाथरवाला येथील स्मशानभूमीत पार पडले. शेषेराव जाधव हे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे अध्यक्ष, दिवंगत विठ्ठलदादा जाधव यांचे वडील आणि महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे उपाध्यक्ष, पत्रकार श्री. ज्ञानेश्वर जाधव यांचे चुलते होते. त्यांच्या निधनाने परिसरात शोकाची लाट उसळली आहे. त्यांच्या आत्म्याच्या शांतीसाठी सर्वांनी प्रार्थना करावी. संप्रदायिक व्यक्तिमत्त्व असणारे शेषेराव जाधव यांच्या निधनाने एक गरुड हरवला आहे. त्यांच्या पश्चात दोन सुना, भाऊ, भावजय, नातवंडे आणि



पुतणे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या जाण्याने परिसरातील एक आदरणीय व्यक्तिमत्त्व गमावल्याची भावना सर्वजण व्यक्त करत आहेत. दैनिक सूर्योदय, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई, गौराई पत्रकार संघ गेवराई व अध्यक्ष न्यूज परिवार त्यांच्या परिवाराच्या दुःखात सहभागी आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्याला शांती देवो आणि परिवाराला या वज्राघात सहन करण्याची शक्ती देवो.

# पुणे महापालिकेच्या सर्व १६५ जागा स्वबळावर लढवणार

**'शहर करू सिंगापूर'चा संकल्प – प्रा. नामदेवराव जाधव**

पुणे : (समर्थ गांवकरी)

सनय छत्रपती शासन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. नामदेवराव जाधव यांनी पुणे येथील पत्रकार भवनात आयोजित पत्रकार परिषदेत आगामी महानगरपालिका निवडणुकांबाबत महत्त्वपूर्ण आणि धक्कादायक घोषणा केल्या. "शहर करू सिंगापूर" या धोरणाअंतर्गत सनय छत्रपती शासन पक्ष पुणे महानगरपालिकेच्या सर्व १६५ जागा स्वबळावर लढवणार असल्याची स्पष्ट माहिती त्यांनी दिली.

याच धर्तीवर राज्यातील एकूण २९ महानगरपालिकांच्या निवडणुकाही पक्ष स्वबळावर लढवणार असल्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

पत्रकार परिषदेत बोलताना प्रा. जाधव यांनी पुणे जिल्ह्यातील वाढत्या प्रदूषणाचा गंभीर मुद्दा उपस्थित केला. सध्या पुणे जिल्ह्याचा हवेचा गुणवत्ता निर्देशांक (AQI) तब्बल ३१६ इतका धोकादायक पातळीवर पोहोचला असून, सिंगापूरमध्ये तो केवळ १२ ते १५ दरम्यान आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले. या वाढत्या प्रदूषणाचा थेट परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत असून, पुणे जिल्ह्यातील नागरिकांचे सरासरी आयुर्मान सुमारे २० वर्षांनी घटत असल्याची अत्यंत गंभीर बाब त्यांनी अधोरेखित केली.



शहरात मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या बांधकाम प्रकल्पांमुळे धुळीचे आणि प्रदूषणाचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. मात्र, या प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी कोणत्याही प्रकारची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याची टीका त्यांनी केली.

सिंगापूरमध्ये बांधकाम स्थळी धूळ आणि प्रदूषण रोखण्यासाठी अत्यंत काटेकोर उपाययोजना राबविल्या जातात, मात्र पुण्यात त्या नियमांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

पुणे शहराचा विकास आजही पाणीपुरवठा, गटार व्यवस्था आणि रस्ते अशा मूलभूत प्रश्नांपुरताच मर्यादित राहिल्याची खंत व्यक्त करत प्रा. जाधव म्हणाले की, शहराच्या खऱ्या विकासासाठी दीर्घकालीन नियोजन, पर्यावरणपूरक धोरणे आणि पारदर्शक प्रशासनाची गरज आहे.

मात्र, वारंवार तेच चेहरे निवडून दिल्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी वाढली असून, आतापर्यंत निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींनी अपेक्षित विकासकामे केली नसल्याची भावना जनतेमध्ये निर्माण झाली आहे.

सनय छत्रपती शासन पक्षाचे उमेदवार निवडून आल्यास पुणे शहराचा नियोजनबद्ध, पारदर्शक आणि सर्वांगीण विकास केला जाईल, अशी ग्वाही प्रा. नामदेवराव जाधव यांनी दिली. "स्वच्छ हवा, शिस्तबद्ध वाहतूक, पर्यावरणस्नेही बांधकामे, दर्जेदार पायाभूत सुविधा आणि नागरिक-केंद्रित प्रशासन" या मुद्द्यांवर पक्ष ठामपणे काम करेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, या पत्रकार परिषदेत राहुल मते यांची सनय छत्रपती शासन पक्षाच्या पुणे शहराध्यक्षपदी निवड झाल्याची अधिकृत घोषणा करण्यात आली. त्यांच्या नियुक्तीमुळे पक्ष संघटना अधिक बळकट होईल आणि आगामी महापालिका निवडणुकांसाठी प्रभावी तयारी केली जाईल, असा विश्वास पक्ष नेतृत्वाने व्यक्त केला.





# डॉ. विश्वासराव आरोटे यांचा सन्मान!

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

## ठाण्यात श्रीमद् भागवत कथा सोहळ्यात मान्यवरांची भेट

ठाणे शहरात आयोजित करण्यात आलेल्या श्रीमद् भागवत कथा सोहळ्यामध्ये थोर समाजसेवक शेठ नानजीभाई खेमजीभाई ठक्कर ठाणावाला यांनी आवर्जून सहभाग नोंदविला. या पावन प्रसंगी त्यांनी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी सदिच्छा भेट घेऊन त्यांचा सन्मान केला.

या भेटीदरम्यान समाजहित, पत्रकारिता आणि सांस्कृतिक परंपरांचे जतन याविषयी सकारात्मक चर्चा झाली. पत्रकारितेच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे कार्य अधिक व्यापक करण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करावेत, असा सूर यावेळी व्यक्त करण्यात आला.

या प्रसंगी नवनाथ जाधव (प्रदेश प्रसिद्धी प्रमुख, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ), संजय फुलसुंदर (महाव्यवस्थापक, दैनिक समर्थ गांवकरी), राजेंद्र पुराणीक आणि राजेंद्र पांडे यांची उपस्थिती लाभली.

श्रीमद् भागवत कथेसारख्या आध्यात्मिक उपक्रमांतून समाजात सद्भावना, नैतिक मूल्ये आणि एकोपा वृद्धिंगत होतो, असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. कार्यक्रम शांततापूर्ण आणि भक्तिभावाच्या वातावरणात संपन्न झाला.

# श्रीरजा तामसेकरचे होमीभाभा बाल वैज्ञानिक स्पर्धेत यश



**तामसा : (समर्थ गांवकरी)**

तामसा येथील पीएमश्री जिल्हा परिषद हायस्कूलची ९ व्या वर्गातील विद्यार्थीनी क्षिरजा अमोल तामसेकर ही डॉ. होमीभाभा बाल वैज्ञानिक स्पर्धेसाठी पात्र ठरली आहे. बृहन्मुंबई विज्ञान शिक्षक संघटनेकडून घेण्यात आलेल्या या स्पर्धेचा निकाल जाहीर झाला असून लातूर विभागात श्रीरजा पात्र ठरली आहे. या स्पर्धेत सहभागी झालेल्या शाळेतील नऊ विद्यार्थ्यांपैकी ती एकमेव पात्र ठरली आहे .विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान दृष्टिकोन व ज्ञान वाढवण्यासाठी ही स्पर्धा राज्यस्तरावर होत असते. या यशाबद्दल मंगळवारी दि १६ डिसेंबर रोजी येथील आयुर्वेदिक दवाखान्यात वैद्यकीय अधिकारी डॉ. रामदास बोंदरवाड यांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला.यावेळी ग्रामीण भागातील विद्यार्थी विज्ञान स्पर्धा परीक्षेत यश मिळवण्याचे प्रमाण वाढणे समाधानकारक असल्याचे मत डॉ. बोंदरवाड यांनी व्यक्त केले.

यावेळी औषध निर्माण अधिकारी संजीवनी पारधी,अमोल तामसेकर,प्रभांजली धानोरकर उपस्थित होते. प्रशालेचे मुख्याध्यापक देविदास अक्कमवाड, शिक्षक गिरीश सुरकुटवार, भाजप महिला मोर्चा तालुका अध्यक्ष ममता जोशी यांनी तिचे अभिनंदन केले.व पुढीलवाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# भगवान अग्रसेन फाउंडेशन तर्फे १५ मार्चला भव्य सामूहिक विवाह सोहळा

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

■ गरजू युवक-युवतींसाठी ५१ जोडप्यांचा विवाह | मानवसेवेचा आदर्श उपक्रम



आजच्या समाजात वाढत चाललेल्या सामाजिक व आर्थिक विषमतेच्या पार्श्वभूमीवर "सामूहिक विवाह सोहळे ही काळाची गरज असून तीच खरी मानवसेवा आहे", असे मत सुप्रसिद्ध समाजसेवक रतनलाल गोयल यांनी व्यक्त केले. त्यांच्या ७३ व्या वाढदिवसानिमित्त भगवान अग्रसेन चॅरिटेबल फाउंडेशनच्या वतीने दि. १५ मार्च २०२६ रोजी गरीब व गरजू कुटुंबातील युवक-युवतींसाठी भव्य सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. गोयल पुढे म्हणाले की, विवाह समारंभांमध्ये होणारा अवाजवी खर्च अनेक कुटुंबांसाठी आर्थिक ओझे ठरत आहे. अनेक पालक मुलीच्या विवाहाच्या चिंतेत असतात. अशा परिस्थितीत सामूहिक विवाह सोहळे समाजात एकता, सहकार्य व मानवतेचा सकारात्मक संदेश देणारे ठरतात. या सोहळ्यात विवाहबंधनात अडकणाऱ्या प्रत्येक जोडप्याला कपाट, पंखा, गादी, चादर, मिक्सर, देव्हा तसेच भांडी-कुंडी संच असे गृहउपयोगी साहित्य भेटस्वरूप देण्यात येणार आहे. यासोबतच वधू-वरांना संपूर्ण वस्त्रसंच, मंगलसूत्र व आवश्यक साहित्यही प्रदान करण्यात येईल, अशी माहिती भगवान अग्रसेन चॅरिटेबल फाउंडेशनचे राजेश अग्रवाल यांनी दिली. हा धार्मिक विधी व हिंदू संस्कृतीनुसार पार पडणारा विवाह सोहळा गोयल गार्डन, आईमाता मंदिरासमोर, गंगाधाम रोड, पुणे येथे आयोजित करण्यात आला आहे. मागील वर्षी या उपक्रमांतर्गत २५ जोडप्यांचा विवाह पार पडला होता, तर यंदा ५१ जोडप्यांचे विवाह लावण्याचा संकल्प आयोजकांनी व्यक्त केला आहे. सर्व विवाह नोंदणी पूर्णतः मोफत असून पुणे, पिंपरी-चिंचवड, पुणे ग्रामीण, कोल्हापूरसह पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा व नाशिक परिसरातील इच्छुक गरजू जोडप्यांनी ९०४९९९२५६० / ९४२०२५०५०४ या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. गोयल कुटुंबाच्या सामाजिक जाणिवेतून साकारलेला हा उपक्रम गरिब, निराधार व सर्वसामान्य समाजघटकांना सन्मानाने वैवाहिक जीवनाची नवी सुरुवात करण्याची सुवर्णसंधी देईल, असा विश्वास रतनलाल गोयल व राजेश अग्रवाल यांनी व्यक्त केला.

# ह.भ.पा.इंदुरीकर महाराज यांचे कीर्तन

**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**

तालुक्यांतील पिंपळगाव म.अनुसुया मंगल कार्यालयात माँ जिजाऊ जन्म महोत्सवानिमित्त ह.भ. प. निवृत्ती महाराज इंदुरीकर यांचा भव्य कीर्तन सोहळा दि.३१ जानेवारी रोजी सा.८ ते ११वा. आयोजित करण्यात आला असल्याची माहिती संयोजकांनी दिली आहे. मॉ जिजाऊ जन्मोत्सवा निमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून मराठा आरक्षण योद्धे मनोज जरांगे पाटील, छत्रपती संभाजी महाराज यांच्यासह नांदेड जिल्ह्यातील अनेक साधु संत या कार्यक्रमास अनुसूया मंगल कार्यालय पिंपळगाव महादेव ता.अर्धापूर येथे अनुसूया मंगल कार्यालयालय येथे उपस्थित राहणार आहेत.

# लाडकी बहीण योजनेची केवायसी करताना महिलांनी अधिकृत सीएससी किंवा सेतू केंद्रातच करा : संदीप आसने

**श्रीरामपूर : (समर्थ गांवकरी)**

राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी लाडकी बहीण योजनेअंतर्गत महिलांना लाभ मिळावा यासाठी केवायसी (KYC) प्रक्रिया अनिवार्य करण्यात आली आहे. मात्र श्रीरामपूर तालुक्यात अनेक ठिकाणी ही केवायसी करताना मोठ्या प्रमाणावर त्रुटी आढळून येत असून, चुकीच्या पद्धतीने केवायसी झाल्यामुळे अनेक पात्र महिलांचे अर्ज अडचणीत येत आहेत. या पार्श्वभूमीवर महिलांनी केवायसी प्रक्रिया करताना फक्त अधिकृत सीएससी (कॉमन सर्व्हिस सेंटर) किंवा सेतू केंद्रातच केवायसी करावी असे आवाहन भाजप सोशल मीडिया सेलचे तालुका संयोजक संदीप आसने यांनी केले आहे. संदीप आसने यांनी सांगितले की, लाडकी बहीण योजनेत केवायसी करताना महिलांनी वडील किंवा पती यांच्या आधारकार्डच्या माध्यमातूनच केवायसी करणे बंधनकारक आहे. मात्र अनेक ठिकाणी वडील किंवा पती यांच्या मोबाईलवर ओटीपी येत नसल्यास, काही खाजगी एजंटांकडून महिलांना चुकीचा सल्ला देत कुटुंबातील इतर सदस्यांचा आधार वापरण्यात येत आहे. अशा प्रकारे केलेली केवायसी नियमबाह्य ठरू शकते आणि भविष्यात महिलांचा योजनेचा लाभ थांबण्याची शक्यता निर्माण होते.श्रीरामपूर तालुक्यातील अनेक गावांमध्ये खाजगी एजंटांकडून महिलांची दिशाभूल केली जात असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. काही ठिकाणी अपूर्ण माहिती, चुकीची कागदपत्रे, तसेच चुकीचे आधार लिंकिंग यामुळे महिलांचे अर्ज बाद होण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे महिलांनी कोणत्याही भूलथापांना बळी न पडता, शासनमान्य केंद्रातूनच केवायसी करून घ्यावी असेही आसने यांनी स्पष्ट केले. ते पुढे म्हणाले की, सीएससी आणि सेतू केंद्रांमध्ये प्रशिक्षित कर्मचारी असून शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसारच केवायसी प्रक्रिया केली जाते. त्यामुळे अशा केंद्रांमध्ये केवायसी केल्यास त्रुटी राहण्याची शक्यता कमी असते. तसेच महिलांनी केवायसी करताना आपली वैयक्तिक माहिती, आधार क्रमांक, मोबाईल नंबर याबाबत दक्षता घ्यावी आणि कोणालाही अनावश्यक माहिती देऊ नये. लाडकी बहीण योजना ही महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी महत्त्वाची योजना असून, केवायसीतील छोट्या चुका सुद्धा लाभ मिळण्यास अडथळा ठरू शकतात. त्यामुळे प्रत्येक महिलेने जबाबदारीने आणि योग्य ठिकाणीच केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी असे आवाहन संदीप आसने यांनी शेवटी केले.

या योजनेचा लाभ कोणत्याही अडचणीशिवाय सर्व पात्र महिलांपर्यंत पोहोचावा यासाठी महिलांनी सतर्क राहून अधिकृत केंद्रांचीच निवड करावी, असेही त्यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात शेवटी नमूद केले आहे.

# तामसा, मनाठा महसूल कार्यालयाच्या लोकार्पणाचा मुहूर्त सापडेना

## करोडोचा निधी खर्चून बांधलेल्या इमारती धुळखात

**तामसा : (समर्थ गांवकरी)**

हदगाव तालुक्यातील तामसा आणि मनाठा, आष्टी येथील ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) व मंडळ अधिकारी कार्यालयांची नव्याने उभारण्यात आलेली शासकीय इमारत आज ही धुळखात पडली आहे. शासनाने कोट्यवधी रुपये खर्चून उभारलेल्या या इमारतींच्या लोकार्पणाचा मुहूर्त मात्र अद्याप सापडलेला नाही. परिणामी आजही महसूल कार्यालयांचे कामकाज खाजगी इमारतीतूनच सुरू असल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. ढिसाळ नियोजनाचे फळ प्रशासनाला ग्राम महसूल अधिकारी आणि मंडळ अधिकारी हे गावागावातील महसूल कामकाजाचे प्रमुख घटक आहेत. जमीन नोंद, दाखले, प्रमाणपत्रे, वारस दावे अशा शेकडो कामांसाठी दररोज नागरिक या कार्यालयांना भेट देतात. शासनाने कायमस्वरूपी उपाय म्हणून शासकीय जागेत सुसज्ज इमारती उभारल्या; परंतु प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनामुळे त्या इमारती आजही कुलूपबंद आहेत.

माहितीनुसार, लोकार्पणाची तयारी मागील काही दिवसापूर्वी पूर्ण झाली होती. पाणी, वीज, रंगकाम, फलक आदी सर्व कामे पूर्ण असूनही, कार्यक्रम रद्द झाल्याने इमारतींना कुलूपच आहे. दरम्यान, लोकार्पण पुढे ढकलण्यामागे काय गौड बंगाल आहे ते स्पष्ट झाले नाही पण या लोकार्पणास "मुहूर्त सापडला नाही" हेच प्रशासनाचे एकमेव कारण सांगितले जाते.

तलाठी कार्यालये खाजगी




जागेत असू नयेत." असे महाराष्ट्र शासन, कार्यासन अधिकारी, मंत्रालय मुंबई पत्र दिनांक : १९ ऑक्टोबर २०२४ शासनाच्या या आदेशानुसार, खाजगी जागेतून महसूल कार्यालयाचे कामकाज चालवणे आणि कार्यालयात खाजगी व्यक्ती मदतनीस म्हणून ठेवणे हे नियमबाह्य आहे. अशा ठिकाणी शासकीय दस्तऐवज सुरक्षित राहत नाहीत, तसेच गैरव्यवहार होण्याची शक्यता वाढते. या नियमाचे उल्लंघन करणाऱ्या अधिकाऱ्यांवर म.ना. से. (शिस्त व अपील) नियम १९७९ अन्वये कारवाई होऊ शकते.

मात्र, हे आदेश हदगाव तालुक्यात लागूच होत नाहीत असे चित्र निर्माण झाले आहे. शासनाचे आदेश केवळ कागदावरच मर्यादित राहिल्याची चर्चा सध्या नागरिकांमध्ये रंगली आहे.

# अश्व-श्वान-कुक्कुट प्रदर्शन व महिला-बालकांसाठी स्पर्धा

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

माळेगाव यात्रेच्या निमित्ताने शुक्रवार दिनांक 18 डिसेंबर रोजी पशुसंवर्धन विभागाच्या वतीने सकाळी 10 वाजता अश्व, श्वान व कुक्कुट प्रदर्शन तसेच विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते होणार असून, खासदार डॉ. अजित गोपछडे व आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. प्रमुख उपस्थितीत आमदार सतीश चव्हाण, आमदार विक्रम काळे, आमदार डॉ. तुषार राठोड, आमदार बालाजीराव कल्याणकर तसेच पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाचे उपायुक्त राजकुमार पडिले उपस्थित राहणार आहेत.

# आई कलाग्राम फाउंडेशन पुणेचा नवीन उपक्रम 'मला व्यक्त व्हायचंय' महिलांना आत्मविश्वासाची नवी दिशा.

**पुणे : (समर्थ गांवकरी)**



आई कलाग्राम फाउंडेशनच्या वतीने आयोजित 'मला व्यक्त व्हायचंय' या विशेष उपक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त आणि भरघोस प्रतिसाद लाभला. महिलांना स्वतःच्या भावना, अनुभव व विचार निर्भीडपणे मांडण्यासाठी सुरक्षित व प्रेरणादायी व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. विविध वयोगटातील महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत हा उपक्रम यशस्वी केला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून सौ. वासंती देवळे (कौन्सिलर व मोटिवेशनल स्पीकर), सौ. स्वाती काशीकर (कौन्सिलर व समाजसेविका) आणि सौ. सुनीती ताई धायगुडे यांचे प्रभावी मार्गदर्शन लाभले. त्यांच्या संवादातून महिलांना मानसिक बळ, आत्मविश्वास आणि सकारात्मक दृष्टिकोन मिळाल्याचे सहभागी महिलांनी आवर्जून नमूद केले.

कार्यक्रमाला विशेष उपस्थिती म्हणून सौ. पुष्पाताई कुदळे, सौ. मोडक तसेच सौ. शिल्पा तिकोणे उपस्थित होत्या. त्यांनी महिलांच्या प्रश्नांवर संवेदनशीलतेने विचार मांडत या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले.

आई कलाग्राम फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्ष सौ. सुनीता निंबाळकर यांनी आपल्या मार्गदर्शनातून महिलांचे सक्षमीकरण, स्व-अभिव्यक्तीला चालना देणे तसेच पीडित महिलांसाठी खंबीर आधार निर्माण करण्याच्या उद्देशाने असे उपक्रम सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले.

कार्यक्रमात सहभागी झालेल्या सर्व महिलांचे आयोजकांच्या वतीने मनःपूर्वक आभार मानण्यात आले. आई कलाग्राम फाउंडेशन आयोजित 'मला व्यक्त व्हायचंय' उपक्रमात मार्गदर्शक, मान्यवर आणि सहभागी महिला.

# शासनाने कापूस खरेदी केंद्रावर कापूस खरेदीची मर्यादा वाढवली

**तामसा : (समर्थ गांवकरी)**

■ शेतकऱ्यांना मोठा मिळाला दिलासा

शेतकऱ्यांच्या कापसाला हमीभाव मिळावा यासाठी सुरू करण्यात आलेल्या शासकीय कापूस खरेदी (सीसीआय) केंद्रावर शेतकऱ्यांना आता हेक्टरी १३ ऐवजी हेक्टरी २३ क्विंटल कापूस विक्री करण्याची मर्यादा वाढवली असल्याची माहिती सीसीआयने माध्यमांशी दिली असून या निर्णयामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. हमी भावात कापूस खरेदी करण्यासाठी शासनाने सीसीआय मार्फत शासकीय कापूस खरेदी केंद्र सुरु केले आहेत. सुरुवातीला शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी १३ क्विंटल एवढाच कापूस सीसीआयला देण्याची मर्यादा ठेवली होती. त्यामुळे शेतकऱ्यांना त्यापेक्षा जास्त असलेला कापूस खाजगी व्यापाऱ्यांना कवडीमोल भावात विकावा लागत होता. परंतु शेतकऱ्यांची खाजगी व्यापाऱ्यांकडून कापूस खरेदीत होणारी लूट लक्षात घेता शासनाने शासकीय कापूस खरेदीत काही अटी शिथिल करुन आता प्रतिहेक्टरी १३ क्विंटल ऐवजी प्रतीहेक्टरी २३ क्विंटलची मर्यादा वाढवली आहे. एवढेच नाही तर कापूस नोंदणीसाठी देखील दि १५ जानेवारी पर्यंतची मुद्दतवाढ दिली आहे. बऱ्याच शेतकऱ्याकडे कापूस आणि सोयाबीनची लागवड असताना पीकविमा भरण्यासाठी केवळ सोयाबीनचेच पेरे सातबाराला लावल्याचे आढळून आले. अशा शेतकऱ्यांचा कापसाचा पेरा नसल्याने कापूस नोंदणीसाठी मोठ्या अडचणी आल्या होत्या.

# कृषी प्रदर्शन, विविध स्टॉलचे बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते उद्घाटन

## कृषी अवजारांची, खते व विविध कृषोपयोगी उपकरणे-घटकांची दालने

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

जिल्हा परिषदेच्या विविध विभागाच्यावतीने श्रीक्षेत्र माळेगाव येथे केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनांची दालने भरविण्यात आली आहेत. यात्रेत जिल्हा परिषदेच्या वतीने जिल्हास्तरीय फळे, भाजीपाला, मसाला पिके प्रदर्शन व स्पर्धेचे उद्घाटन सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी शिवानंद हिंगणे, शिवाजीराव देशमुख, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दत्तात्रय कळसाईत, कृषि विकास अधिकारी डॉ.अनिलकुमार ऐतवडे यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

कृषि उन्नतीसाठी शेतक-यांनी आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरावी तसेच शेतीला जोडव्यवसाय दयावा असे प्रतिपादन सहकारमंत्री बाळासाहेब पाटील यांनी केले. याप्रसंगी आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी जिल्हा परिषदेच्या वतीने उभारण्यात आलेल्या कृषि प्रदर्शनाचा शेतक-यांनी भेट द्यावी असे आवाहन केले. अनेक शेतकरी माळेगाव यात्रेत आणलेल्या भाजीपाला, विविध पिके तसेच मसाला वर्गीय पिके प्रदर्शनातून अनेक शेतक-यांना प्रेरणा मिळते असेही ते म्हणाले. प्रदर्शनात विविध दालने आहेत ज्यामध्ये वैशिष्ट्यपुर्ण वाणाचे विविध फळे, भाजीपाला आणि पिकांचे प्रदर्शन मांडण्यात आलेले आहेत. तसेच कृषी अवजारांची, खते व विविध कृषोपयोगी उपकरणे-घटकांची दालने आहेत. याशिवाय शिक्षण विभाग, महिला व बालकल्याण विभाग, आरोग्य व समाज कल्याण विभाग, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, कृषि व पशुसंवर्धन विभाग यांच्यासह विविध विभागाचे दालने आहेत त्यांचेही मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या कृषी प्रदर्शनात कृषी अवजारांची, खते व विविध कृषोपयोगी उपकरणे-घटकांची सुमारे शंभर दालने उभारण्यात आली आहेत.



या प्रदर्शनाला हजारो शेतक-यांनी भेटी घेवून माहिती जाणून घेतली. येथे विविध पीक व आवजारांचे प्रात्यक्षिकही दाखवली जात आहेत. श्रीक्षेत्र माळेगाव यात्रेत दरवर्षी प्रमाणे यंदाही विविध जनावरे घेऊन पशुमालक दाखल झाले आहेत. उच्च प्रतीची जनावरे मिळण्याचे दक्षिण भारतातील महत्वाचे ठिकाण म्हणून यात्रेचा लौकिक आहे. याठिकाणी व्यापाऱ्यांची अनेक वस्तु विक्रीची दुकाने थाटली. शेती आणि घरातील उपयोगाच्या लहान-मोठ्या वस्तु या यात्रेत नागरिक खरेदी करीत असल्याने यावर्षीही व्यापारपेठ मोठ्या प्रमाणात फुलली आहे. यात्रेचे मुख्य आकर्षण असलेल्या लहान मुलांपासून थोरा-मोठ्या पर्यंतच्या सर्व प्रकारच्या मनोरंजनाच्या गोष्टींनी ही यात्रा सजली आहे. लोककलाच्या सादरीकरणासाठी कलावंतांच्या संचांनी ठिकठिकाणी तंबू थाटले आहेत. मनोरंजनाच्या खेळांचे अनेकविध प्रकारही दाखल झाले आहेत.

# बुद्धिवाद्यांची खामोशी येणाऱ्या पिढ्यांच्या भवितव्यावर घाला ठरते!

## नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर चिंताजनक वास्तव समोर

**मुखेड : (समर्थ गांवकरी)**

नगरपरिषदेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर समाजातील वैचारिक आणि जागरूक घटकांची भूमिका पुन्हा एकदा ऐरणीवर आली आहे. भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला दिलेला मतदानाचा अमूल्य अधिकार हा केवळ उमेदवार निवडण्यासाठी नसून, विवेकबुद्धीच्या आधारे विकास, सेवा आणि लोककल्याणाची दिशा ठरवण्यासाठी आहे. मात्र, आज या अधिकाराचा वापर अपेक्षित पद्धतीने होताना दिसत नाही, ही गंभीर बाब आहे. भांडवली शक्ती, अमिषांची लालूच आणि दबंगगिरी यामुळे मतदारांची दिशाभूल होत असून, सेवा व विकास या संकल्पना केवळ घोषणांपुरत्या मर्यादित राहिल्या आहेत. याहूनही अधिक चिंताजनक बाब म्हणजे समाजातील तथाकथित बुद्धिवादी वर्ग या साऱ्या प्रक्रियेकडे मौन बाळगून पाहत आहे. हे मौनच उद्याच्या पिढ्यांसाठी घातक ठरणार असल्याची भावना सुज्ञ नागरिकांतून व्यक्त होत आहे. "समाजातील परिवर्तनाची जबाबदारी नेमकी कोणाची?" आणि "संभ्रमित मतदाराला जागरूक करण्याची नैतिक जबाबदारी कोण निभावणार?" असे सवाल उपस्थित होत आहेत. आज जर दबंगगिरीसमोर बुद्धिवादी वर्ग गप्प बसत असेल, तर उद्याचे भवितव्य अंधारमय होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. क्रांतीवीर चित्रपटातील "तुम्हारी ये खामोशी कल तुम्हारे बच्चों के लिए रोना बन जायेगी" हे वाक्य आजच्या सामाजिक वास्तवावर नेमके बोट ठेवते, असे मत जाणकारांनी व्यक्त केले आहे.

अनैतिक मार्गाने मिळवलेल्या भांडवली ताकदीच्या जोरावर गरीब व दुर्बल घटकांचे शोषण करणाऱ्या प्रवृत्ती रोखण्यासाठी समाजाने सजग होण्याची गरज असल्याचे मत व्यक्त होत आहे. पुलाखालून पाणी वाहून गेल्यावर पश्चात्ताप करून उपयोग नसतो, त्यामुळे वेळेतच जबाबदारी स्वीकारण्याचे आवाहन करण्यात येत आहे. "आपले संस्कारित गाव आणि शहर लुटले जात असताना मुकदर्शक बनू नका," असा इशारा देत आजची चुप्पी येणाऱ्या अनेक पिढ्यांना लाचार आणि गुलाम बनवू शकते, अशी तीव्र भावना व्यक्त करण्यात आली आहे. लोकशाहीची लक्तरे वेशीवर टांगली जाऊ नयेत यासाठी संविधानाने दिलेल्या हक्कांप्रती जागरूक राहण्याची गरज अधोरेखित करण्यात आली आहे. नगरपरिषदेवर सत्ता आणि अमाप संपत्तीच्या जोरावर कब्जा मिळवू पाहणाऱ्या ताकतींचा बिमोड करून, सेवाभाव जपणाऱ्या आणि जनतेच्या हितासाठी काम करणाऱ्या उमेदवारालाच मतदारांनी बळ द्यावे, असे आवाहन या माध्यमातून करण्यात आले आहे.

# शहा यांच्या हस्ते सिग्निफाय हर गांव रोशन सीएसआर उपक्रमाचे उद्‌घाटन

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**



त्यांच्या उज्ज्वल जीवन, उत्तम जगदृष्टिकोनाचा एक भाग म्हणून सिग्निफाय (युरोनेक्स्ट: लाईट) या जगभरांतील आघाडीच्या लायटिंग कंपनी तर्फे आज त्यांचा महत्त्वपूर्ण असा सीएसआर उपक्रम असलेल्या हर गांव रोशन उपक्रमाची छत्तीसगढ येथे सुरुवात करण्यात आली. या अतिशय प्रतिथयश उपक्रमाचे उद्‌घाटन देशाचे माननीय केंद्रीय गृहमंत्री श्री अमित शहा यांच्या हस्ते करण्यात आले. यामुळे आता ग्रामीण भागातील नवीन बदलाला सुरुवात झाली आहे. या उपक्रमाची अंमलबजावणी ही छत्तीसगढ सरकार आणि भारत केयर्स यांच्या माध्यमातून करण्यात येणार असून यामुळे इंद्रावती टायगर रिझर्व्हस विभागातील ७० गावांमध्ये उर्जा बचत करणारे कार्यक्षम असे एलईडी लाईट्स बसवण्यात येणार आहेत, ज्यामुळे गावकऱ्यांना आता सुरक्षित प्रवास करणे शक्य होणार आहे.

## थोडक्यात बातम्या...

### PCPNDT कायद्याबाबत श्रीगोंद्यात जनजागृती कार्यशाळा संपन्न

**श्रीगोंदा (स. गांवकरी) :** गर्भधारणा पूर्व व प्रसूतीपूर्व निदान तंत्रज्ञानाद्वारे लिंगनिवडीस प्रतिबंध करणारा PCPNDT कायदा प्रभावीपणे अंमलात आणण्यासाठी आज दिनांक १८ डिसेंबर २०२५ रोजी श्रीगोंदा पंचायत समिती दक्षता समिती व ग्रामीण रुग्णालय श्रीगोंदा यांच्या संयुक्त विद्यमाने जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. रंजीत अकोलवार, सहाय्यक गटविकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा होते. प्रमुख पाहुणे म्हणून मा. डॉ. सुधाताई कांकरिया, 'जन्माचे स्वागत करा' चळवळीच्या प्रणेत्या मा. ॲड. सुरवसे (जिल्हा समन्वयक, सामान्य रुग्णालय, अहिल्यानगर), मा. डॉ. डांगे मॅडम (तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा) तसेच मा. डॉ. कोकरे (वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय श्रीगोंदा) उपस्थित होते. कार्यशाळेस ग्रामविस्तार अधिकारी, पोलीस पाटील, सरपंच, पोलीस केंद्रप्रमुख, गटप्रमुख, पंचायत समिती कर्मचारी, ग्रामीण रुग्णालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अभिजीत तिवाटणे यांनी केले, तर सूत्रसंचालनाची जबाबदारी डॉ. प्रसाद टकले (श्रीगोंदा) यांनी यशस्वीरीत्या पार पाडली. या कार्यशाळेत PCPNDT कायद्याचे महत्व, कायदेशीर तरतुदी व समाजातील जनजागृती याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.




### मनपा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आचारसंहिता कक्षाची स्थापना

**अहिल्यानगर (स. गांवकरी) :** महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला असून महानगरपालिका क्षेत्रात आचारसंहिता लागू झाली आहे. निवडणूक काळात आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होऊ नये, यासाठी प्रशासनाकडून उपाययोजना करण्यात येत आहेत. त्याच अनुषंगाने नागरिकांना आचारसंहितेचे उल्लंघन होत असल्याबाबत माहिती व तक्रार देण्यासाठी आचारसंहिता कक्ष स्थापन करण्यात आला आहे. त्यासाठी उपजिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी तथा आयुक्त यशवंत डांगे यांनी दिली. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील सभागृह नेता यांच्या दालनात आचारसंहिता कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या कक्षाच्या प्रमुख म्हणून उपजिल्हाधिकारी सायली सोळंके यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच, त्यांना सहाय्यक म्हणून नगररचना विभागाचे रचना सहाय्यक जितेंद्र शेळके, अतिक्रमण निर्मूलन विभाग प्रमुख आदित्य बल्लाळ, क्षेत्रीय अधिकारी रिझवान शेख यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. निवडणुकीची आचारसंहिता निवडणूक कार्यक्रम जाहीर केलेल्या वेळेपासून व दिनांकापासून लागू झाली आहे. निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत आचारसंहिता अंमलात राहील. ही आचारसंहिता महानगरपालिकेच्या संपूर्ण क्षेत्रात लागू राहील. या क्षेत्रातील मतदारांवर प्रलोभन देणारी कोणतीही कृती अथवा घोषणा कोणत्याही मंत्री, खासदार, आमदार, नगरसेवक, इतर पदाधिकाऱ्यांना किंवा शासनाच्या विभागाला इतरत्र सुध्दा करता येणार नाही, असे राज्य निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे महानगरपालिका क्षेत्रात आदर्श आचारसंहितेची कठोर अंमलबजावणी केली जाणार असल्याचे डांगे यांनी सांगितले.

### म. न. पा. निवडणूकीत प्रभाग क्रमांक ५ मधून गाडे मैदानात

**अहिल्यानगर (स. गांवकरी) :** येथील महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक ५ मधून गाडे परिवारातील नवा चेहरा राजकीय मैदानात उतरल्याने हालचालींना वेग आला आहे. माझी स्थायी समिती सभापती संजय बाबुराव गाडे उर्फ संजू काका २००८ ते २०१३ मधल्या काळात नगरसेवक असताना या काळात अडीच वर्षे स्थायी समिती सभापती असताना गोविंदपुरा सहा कॉलनी फकीरवाडा यशवंत कॉलनी विराज कॉलनी या परिसरात भरीव विकास काम केलेले असून वाडाचा कायापालट केला आहे. त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवून वार्ड क्रमांक पाच नागरिकांचा मागासवर्गीय मधून त्यांचे चिरंजीव विनीत संजय गाडे पाटील वडिलांकडून विकासाचा बाळकडू विनीतनी घेतला असल्याने त्याच पावलावर पाऊल ठेवून वार्ड नंबर पाचचा कायापालट करण्याचा निर्णय निवडणूक क्षेत्रासाठी घेण्यात आला आहे. महापुरुषांच्या प्रेरणेने, आई-वडिलांच्या मार्गदर्शनाने आणि आपल्या प्रभागातील तमाम माता-भगिनी व बांधवांच्या अतूट विश्वासाने, मी आगामी महानगरपालिका निवडणुकीत 'नगरसेवक' पदासाठी सज्ज झालो आहे. आपल्या प्रभागाचा कायापालट करण्यासाठी आणि सामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आपल्या खंबीर साथीची अपेक्षा आहे.

# विष्णुपूरी येथिल शासकीय रुग्णालयात अत्याधूनिक उच्च क्षमतेची सिटिस्कॅन मशिन उपलब्ध

## नांदेड सह मराठवाड्यातील रुग्णांना मिळणार मोठा दिलासा



**नांदेड जिल्हा (अनिल धमने पाटील) : (समर्थ गांवकरी)**

डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, विष्णुपूरी, नांदेड येथील क्ष-किरणशास्त्र (Radiology) विभागामध्ये अत्याधुनिक व उच्च क्षमतेची Siemens कंपनीची १२८ Slice सिटि स्कॅन मशीन नव्याने कार्यान्वित करण्यात आली आहे. या प्रगत वैद्यकीय सुविधेची जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी आज दि १७ डिसेंबर रोजी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. ही Siemens १२८ Slice CT Scan मशीन अत्यंत जलद. अचूक व उच्च रिझोल्यूशन प्रतिमा देणारी असून अल्प वेळेत संपूर्ण शरीर तपासणी करण्याची क्षमता या मशीनमध्ये आहे. या मशीनच्या सहाय्याने मेंदूचे आजार, स्ट्रोक, मेंदूतील रक्तस्राव, हृदय व रक्तवाहिन्यांचे विकार, अपघातातील अंतर्गत दुखापती तसेच छाती व पोटातील गंभीर व गुंतागुंतीच्या आजारांचे अचूक व त्वरित निदान करणे शक्य होणार आहे.

Virtual Bronchoscopy या सुविधेमुळे फुफ्फुसातील अंतर्गत गाठींचे अचूक निदान करता येते. तसेच शरीरातील विविध प्रकारच्या गाठींची Biopsy करण्याची सुविधा उपलब्ध आहे. अन्ननलिकेतील आजारांचे निदान करण्यासाठी Dynamic Oral Contrast Study ही तपासणी करून संबंधित आजारांचे अचूक निदान करण्यास मदत होते.

अर्धांगवायूने ग्रस्त झालेल्या रुग्णांमध्ये मानेतील व मेंदूतील रक्तवाहिन्यांची तपासणी या यंत्रावर उपलब्ध आहे. अपघातग्रस्त रुग्णांचे Whole Body CT Scan करता येत असल्याने कमीत कमी वेळेत योग्य निदान करून प्रभावी व तातडीची रुग्णसेवा देणे शक्य होते. तसेच पाठीच्या मणक्यांशी संबंधित विविध आजारांचे निदान देखील या यंत्रावर करता येते. या यंत्राद्वारे महिला रुग्णांच्या गर्भाशयाची पिशवी तसेच इतर अवयवांतील विविध आजारांचे अचूक निदान करण्यात येते. तसेच लहान मुलांमधील दुर्धर आजारांचे निदानसुद्धा या अत्याधुनिक यंत्राद्वारे करण्यात येते.

या CT Scan मशीनची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत अत्यंत कमी वेळेत (High Speed Scanning) तपासणी पूर्ण होणे, कमी किरणोत्सर्गात (Low Radiation Dose) उच्च दर्जाचे स्कॅन, ३D व ४D इमेजिंग सुविधेमुळे अधिक अचूक निदान, मेंदू, हृदय, फुफ्फुसे, पोट व संपूर्ण शरीराचे सविस्तर परीक्षण, अपघातग्रस्त रुग्णांसाठी तातडीने Whole Body CT Scan सुविधा, हृदयाच्या रक्तवाहिन्यांचे (CT Coronary Angiography) अचूक परीक्षण तसेच बालरुग्ण व वृद्ध रुग्णांसाठी सुरक्षित तपासणी व्यवस्था. या अत्याधुनिक सुविधेमुळे रुग्णांच्या उपचार प्रक्रियेत सुलभता येऊन वेळेची मोठ्या प्रमाणात बचत होणार असून गंभीर रुग्णांचे तात्काळ व अचूक निदान करणे शक्य होणार आहे.

नांदेड जिल्ह्यात अशा प्रकारची उच्च क्षमतेची Siemens १२८ Slice CT Scan मशीन एकमेव स्वरूपात डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, विष्णुपूरी, नांदेड येथे उपलब्ध झाली असून याचा थेट लाभ जिल्ह्यातील तसेच परिसरातील हजारो रुग्णांना होणार आहे.

या पाहणीदरम्यान जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी रुग्णालयाच्या एकूण स्वच्छतेबाबत तसेच दैनंदिन कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले व रुग्णालय प्रशासनाच्या कार्याचे कौतुक केले.

# निवडणूक निर्णय कार्यालयाची पाहाणी



**नवीन नांदेड : (समर्थ गांवकरी)**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक अनुषंगाने सिडको क्षेत्रीय कार्यालयाची पाहणी करून सुसज्ज करण्यात येणाऱ्या नूतनीकरण काम काज पाहणी केली. नावामनपाच्या सार्वत्रिक निवडणुक अनुषंगाने प्रभाग १९ व २० साठी निवडणूक निर्णय विभागाचे कार्यालय करण्यात आले असून त्या अनुषंगाने, दि १८ डिसेंबर रोजी अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम यांनी पाहाणी करून योग्य त्या सुचना केल्या असून, यावेळी मनपाचे सार्वजनिक बांधकाम विभाग अभियंता अरूण शिंदे, सिडको क्षेत्रीय कार्यालय सहायक आयुक्त डॉ.मिर्झा बेग यांच्या सह करनिरीक्षक, वसुली लिपीक कर्मचारी उपस्थिती होती.

येणाऱ्या नावांमनपाच्या सार्वत्रिक निवडणूकीचा अनुषंगाने सिडको क्षेत्रीय कार्यालया नूतनीकरण काम सुरुवात असून या कार्यालय अंतर्गत निवडणूक निर्णय विभागाची निर्मिती करण्यात आली असून प्रभाग १९ व २० या दोन्ही प्रभागाचे निवडणूक कार्यालयीन कामकाज सुरू करण्यात आले असून याची पाहाणी करण्यासाठी अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम यांच्या सोबत अभियंता अरूण शिंदे, उपअभियंता खुशाल कदम ठाणेदार ,यांनी पहाणी केली असून लवकर विभागातील कामे पूर्ण करण्यासाठी सहाय्यक आयुक्त डॉ .मिर्झा बेग यांच्याशी चर्चा केली यावेळी करनिरीक्षक शादुला बेग ,वसंत कल्याणकर ,वसुली लिपीक यांच्यासह वसुली लिपिक यांची उपस्थिती होती.

# माणूसकी उरली नाही : अकरा दिवस मृत्यूशी झुंज मात्र एकही राजकीय पुढारी मदतीसाठी धावला नाही, ही शोकांतिका..!

## त्या अपघातात गंभीर जखमी झालेल्या तिसऱ्याही तरुण मजुराचा उपचारादरम्यान मृत्यू..!

**कंधार : (समर्थ गांवकरी)**





राजकीय पुढारी हे फक्त निवडणुकीच्या काळात मी जनतेसोबत असल्याचा मोठा गाजावाजा करत असतात, निवडणुकीत कोट्यावधी रुपये खर्चून आपलं वर्चस्व कसं टिकून राहील, यासाठी वाटेल ते प्रयत्न करत असतात परंतु एखांदा मतदार संघातील किंवा वार्डातील व्यक्ती संकटात सापडला असताना अशा व्यक्तींना मदतीची अपेक्षा असताना कोणताही राजकीय पुढारी धावून जात नाही अशीच घटना कंधार तालुक्यातील बहाद्दरपुरा येथील रहिवासी असलेले शेख कुटुंबातील सहा व्यक्ती पोटाचा उदरनिर्वाहासाठी मासेमारी करण्यासाठी जात असताना त्यांच्या वाहनाला अपघात होऊन एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला होता तर सोबतचे पाच तरुण शासकीय रुग्णालयात मृत्यूशी झुंज देत होते. ही मोठी घटना घडली असतानाही त्या जखमींना मदत करण्यासाठी कोणताच राजकीय पुढारी समोर आला नाही. सर्वच राजकीय पुढारी हे निवडणुकीत व्यस्त होते परंतु या मृत्यूशी झुंज देणाऱ्या रुग्णांचा विचार आला नाही यावरूनच सध्या माणुसकी उरली नसल्याचे चित्र दिसून आले असा प्रश्न निर्माण झाला आहे.

तब्बल ११ दिवस मृत्यूशी झुंज देणाऱ्या शेख हाजी शेख पाशा वय ५२ वर्षे यांची प्राणज्योत मालवली ही राजकीय पुढाऱ्यांसाठी शरमेची बाब आहे. भविष्यात या कुटुंबाचे सांत्वन करण्यासाठी राजकीय पुढारी घरी येऊन आम्ही तुमच्या दुःखात सहभागी असल्याचे गाजावाजा करून मोकळे होतील. परंतु अशा पुढाऱ्यांना या कुटुंबाने घराची पायरीही न चढू देने हेच या मयतांना खरी श्रद्धांजली ठरेल.

तालुक्यातील बहाद्दरपुरा येथील खंदक गल्लीत राहणारे एकाच कुटुंबातील तरुण मासेमारी करण्यासाठी नर्सी या मार्गावरून जात असताना दि.६ डिसेंबर २०२५ रोजी नरसी रोडवर राहेर फाटा पेट्रोल पंपाजवळ समोरून भरधाव वेगात येणाऱ्या ट्रकने छोटा हत्ती या वाहनास जोराची धडक दिल्यामुळे छोट्या हत्ती मधील मजूर शेख जानी शेख पाशा यांचा त्याच दिवशी मृत्यू झाला होता,तर बाकी जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.परंतु आर्थिक परिस्थिति हालाकीची असल्यामुळे पैशा अभावी योग्य उपचार न मिळाल्याने त्या जखमींपैकी दुसऱ्याचा मृत्यू झाला शेवटचा ११ दिवस मृत्यूशी झुंज देत असणारा शेख हाजी शेख पाशा यांचा ही दि. १७ रोजी मृत्यू झाल्याची दुःखद घटना घडली आहे.

राजकीय पुढारी हे मताचा जोगवा मागण्यासाठी विविध कार्यक्रमांना आर्थिक मदत करत असतात, परंतु एखाद्या गोरगरीब अडल्या - नडल्या किंवा आर्थिक परिस्थितीने गरीब असलेल्या रुग्णांना राजकीय हे मदत करण्यासाठी समोर येत नसतात हे वास्तव चित्र दिसून येत आहे.

# माळेगाव यात्रेस सुरूवात; भाविकांनी घेतले पालखीचे दर्शन

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**



उत्तम जागा पाहूनी मल्हारी देव नांदेड गड जेरुरी अशा जय घोषात येळकोट येळकोट जय मल्हार म्हणत, बेलभंडा-याची उधळण करीत पारंपारीक पध्दतीने यंदाही माळेगावच्या श्रीखंडोबा रायाच्या यात्रेस शुभारंभ झाला आहे. यावेळी लाखोभाविकांनी पालखीचे दर्शन घेतले. खंडोबाच्या व मानक-यांच्या पालखीचेप्रतिवर्षाप्रमाणे शासकीय विश्रामगृहावर जिल्हा परिषदेच्या वतीने स्वागत करण्यातआले. दुपारी पालखी पुजनानंतर देव स्वारी काढण्यात आली. यावेळीमानक-यांचा गौरव करण्यात आला. यावेळी सहकारमंत्री बाळासाहेब पाटील, राज्यमंत्री मेघनाबोर्डीकर, आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, जि.प. माजी सभापती प्रविण पाटील चिखलीकर, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली,सामाजिक कार्यकर्त्या प्रणिताताई देवरे-चिखलीकर, शिवानंद हेगळे यांची उपस्थितीहोती. मानक-यांचा गौरव -पालखीचे मानकरी गणपतराव मल्हारी नाईक (रिसनगाव),गोविंदराव नागेशराव महाराज (कुरुळा), व्यंकटराव मारोतीराव पांडागळे (शिराढोण), खुशाल भगवानराव भोसीकर (पानभोसी), गोविंदराव बाबाराव नाईकवाडे (पानभोसी), पांडुरंग नारायणराव पाटील (माळेगाव), मल्हारी रावसाहेब पाटील (माळेगाव), विजयकुमार शंकरराव कनकंदडे, आंबादास खंडेराव जहागीरदार या मानक-यांचा जिल्हा परिषदेच्या वतीने जोडआहेर,मानाचा फेटा बांधून गौरव करण्यात आला. खंडोबा यात्रेत वाघ्या-मुरळी -उत्तम जागा पाहूनी मल्हारी देव नांदे गड जेजूरी उत्तराचीजेजूरी गडाला नऊ लाख पायरी असा घोष करत वाघ्या मुरळी खंडोबाची सेवा करते. पारंपारीकपध्दतीने कवडयाच्या माळी, लांब हळदीचा मळभट, हातापायावर चाबकाचे फटके मारत वाघ्या मुरळी खंडोबाची सेवाकरत असते. या वाघ्या मुरळीला पाहण्यासाठी हजारो भाविकांनी मोठी गर्दी केली आहे. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, जिल्हा ग्रामीण विकासयंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले, सामान्य प्रशासन विभागाचे उप मुख्यकार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, पंचायत विभागाचे उप मुख्य कार्यकारीअधिकारी जी.बी. गिरी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, उप मुख्यकार्यकारी अधिकारी अमित राठोड, प्रशांत थोरात, मयूरकुमार आंदेलवाड, शिक्षणाधिकारीप्राथमिक वंदना फुटाणे, माध्यमिकचे शिक्षणाधिकारी माधव सलगर, पशुसंवर्धन सहआयुक्तडॉ. प्रविणकुमार घुले, समाजकल्याण अधिकारी सत्येंद्र आऊलवार, जिल्हा कृषी विकासअधिकारी डॉ. निलकुमार ऐतवडे, आकाशवाणीचे कार्यक्रम अधिकारी विश्वास वाघमारे, गटविकास अधिकारी महेंद्र कुलकर्णी, जि.प. माजी सभापती संजय पाटील क-हाळे, माजी जिल्हा परिषद सदस्य चंद्रसेनपाटील, पंचायत समितीचे माजी सभापती रोहित पाटील आंडगेकर, डॉ. दत्तराव गवळी, बाळूपाटील बाबर, अनिल बाबर, यांच्यासह विविध विभागचे खाते प्रमुख, अधिकारी,जिल्हयातील सर्व गट विकास अधिकारी यांची उपस्थिती होती.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# नागरिकांनी शिवसेनेच्या स्वतंत्र पॅनलचे केले स्वागत

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नगर विकास खात्या मार्फत राज्यात वेगाने कामे होत असल्याने तसेच आपण नगराध्यक्ष आणि नगरसेवक म्हणून शहर आणि जुना प्रभाग क्रमांक ४आताचा प्रभाग क्रमांक ७ मध्ये रस्ते आणि गटारीची समस्या सोडवल्याने नागरिकांनी शिवसेनेच्या स्वतंत्र पॅनलचे स्वागत केले शिवसेनेच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ.शुभांगी पोटे व नगरसेवक पदाची निवडणूक लढवणारे सर्व उमेदवार विजयी होतील आणि शनिवार दिनांक २० डिसेंबर रोजी प्रभाग क्रमांक ७ब मधील होणाऱ्या एका जागेच्या निवडणुकीत आपण मोठ्या फरकाने विजयी होऊ असा विश्वास माजी नगराध्यक्ष मनोहर पोटे यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केला. प्रभाग क्रमांक ७ब मधील मतदारांच्या भेटीत नागरिकांचा प्रतिसाद मिळत असून नागरिक उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून झालेल्या विकासकामावर समाधानी असून भविष्यात देखील विकास कामे वेगाने होतील अशी खात्री नागरिकांना आहे असे सांगून पोटे म्हणाले आम्ही विकास कामाच्या माध्यमातून मत मागत आहोत.



नागरिकांनी देखील पूर्वीच्या काळात असलेल्या समस्या आणि आमच्या साडेसात वर्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या कार्यकाळात झालेली कामे पाहिली आहेत नगर परिषद हि नागरिकांच्या नागरी सुविधा पुरविण्यासाठी प्राधान्याने काम करते आम्ही देखील सामान्य नागरिक केंद्रबिंदू मानूनच काम केले त्यामुळेच अशक्य वाटणारे स्वतंत्र पॅनल अखेर उभे राहिले उमेदवार नागरिकांच्या विश्वासास पात्र असणारी मिळाले असे सांगून प्रभाग क्रमांक ७ब मधील आपला विजय निश्चित होईल आणि शहर विकासाची घोड दौड सुरू राहील असे स्पष्ट केले.यावेळी मनोहर पोटे यांनी प्रभाग क्रमांक ७ मधील केलेल्या रविवार पेठ रस्ता,हनुमान नगर मधील प्रलंबित रस्त्यांची केलेली कामे,आदींची माहिती दिली.

प्रभाग क्रमांक ७ मधील इंदिरा नगर वसाहत हि श्रमिकांची वसाहत असून त्यांना हक्काची जागा मिळावी हि मागणी वर्षानुवर्ष होत राहिली पण उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या बाबत धोरण घेत स्वतःची हक्काची जागा मिळवून देण्यासाठी पुढाकार घेतला आपण नामदार एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून येथील रहिवाशांचा हक्काच्या जागेचा आणि त्यावरील घरकुल बाबतचा प्रश्न सोडवू असे मनोहर पोटे यांनी सांगितले. यावेळी नंदकुमार ताडे, बाळासाहेब दुतारे आदी उपस्थित होते.

# ठाकरे शिवसेनेचे आरोग्य सुविधांसाठी कळवा हॉस्पिटलच्या अधिष्ठाना निवेदन

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे विधानसभा संघटक चंद्रकांत विधाटे यांच्या पुढाकाराने व छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयातील अधिष्ठाता (डीन ) सौ स्वप्नाली कदम यांच्या सहकार्याने सर्वपक्षीय बैठक आयोजित करण्यात आली. राजीव गांधी वैद्यकीय विद्यालय व छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय कळवा यांच्या सभागृहात सदर बैठक आयोजित करण्यात आली होती. प्रसंगी अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी रुग्णासाठी आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध होण्यासाठी चर्चासत्रामध्ये भाग घेतला. सदर रुग्णालयात सुपर स्पेशलिटी सुरू करणे जेणेकरून येणाऱ्या रुग्णांना सायन, के ई म, जे जे किंवा नायर हॉस्पिटल इत्यादी ठिकाणी पाठवण्याची वेळ येणार



नाही. रुग्णालयात आयसीसी यु. एन आय सी यु. बेड कमी असल्याने सिरीयस पेशंट रस्त्यातच दगावतो, कर्मचारी वर्गाची कमतरतेमुळे उपलब्ध कर्मचाऱ्यावर ताण, एच आय व्ही, एच वन बीसी, इलेक्ट्रोमी इत्यादी रक्त तपासण्या तेथेच मिळाव्यात, पुरेसा औषधी पुरवठा, सर्जरी वार्डात बेड उपलब्ध व्हावे, गर्भवती महिलांचे हेळसांड होऊ नये, अतिदक्षता विभागातील खाटा वाढवणे आदी विषय मांडण्यात आले. प्रसंगी अधिष्ठाता (डीन) सौ स्वप्नाली कदम यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. प्रसंगी ठाकरे शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख प्रदीप शिंदे, विधानसभा संघटक चंद्रकांत विधाटे, विधानसभा संघटिका पुष्पलता भानुशाली, कळवा शहर समन्वयक नीलिमा शिंदे, श्रीकांत मोरे, मुकुंद ठाकूर, माधुरी ठाकरे, वसंत सुतार, दिनेश ठाकूर, राजकिरण तळेकर, राम घुडेकर, शशिकांत कुंभारगण, प्रकाश मोहिते, विजय कदम आदी उपस्थित होते.

# महिरावणी येथील मातोश्री पाटील विद्यालयात अल्पसंख्यांक हक्क दिवस व आंतरराष्ट्रीय प्रवासी दिन उत्साहात साजरा

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

मातोश्री गिताबाई देवराम पाटील माध्यमिक विद्यालयात अल्पसंख्यांक हक्क दिवस व आंतरराष्ट्रीय प्रवासी दिन विद्यालयाचे मुख्याध्यापक अशोक भदाणे यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमांतर्गत विद्यालयात इयत्ता सहावी ते आठवी आणि नववी दहावी या दोन गटात निबंध स्पर्धा आणि वकृत्व स्पर्धा घेण्यात आली. यावेळी निबंध स्पर्धेत ११५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेत उत्तम निबंध लिहिले.आयोजित वकृत्व स्पर्धेत विद्यालयातील कुमार अथर्व प्रभाकर डगळे, कुमार आर्यन अशोक गोराळे, कुमार चेतन यशवंत राऊत, कुमार सार्थक रघुनाथ कापसे, कुमार रणजीत भैरवलाल गाडरी, कुमारी अनिता अशोक राठोड, कुमारी सपना काळू खोडे, कुमारी पायल भीमा



डंबाळे, कुमारी शालिनी किसन बोडके, कुमारी अश्विनी गोकुळ खांडबहाले, कुमारी भाग्यश्री धनंजय खांडबहाले या अकरा विद्यार्थ्यांनी सहभाग घेत अत्यंत प्रभावी व विचारप्रवर्तक भाषणे सादर केली. यावेळी विद्यालयातील उपशिक्षक संजय पवार यांनी अल्पसंख्यांक हक्कांचे महत्त्व व आंतरराष्ट्रीय प्रवासी दिनाचे सामाजिक व मानवी मूल्यांतील स्थान याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी वकृत्व स्पर्धेत भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांना मुख्याध्यापकांच्या हस्ते पेन देऊन अभिनंदन केले. यावेळी कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक उपशिक्षक बाळासाहेब सोनवणे यांनी केले. सूत्रसंचालन उपशिक्षिका सुरेखा आहेर(भामरे) यांनी केले, तर आभार समाधान शेवाळे यांनी मानले. कार्यक्रमास उपशिक्षक देवेंद्र देवरे, संजय गायकवाड, अश्विनी चौरे, दिपाली वाडीले, अतुल कुलथे, दिलीप खांडबहाले, विलास येवले आदी शिक्षकवृंद तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बांगलादेशी नागरिकांनी मिळवले पासपोर्ट

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

बांगलादेशी नागरिकांनी बनावट नावे, पत्ते व कागदपत्रांच्या आधारे भारतीय पासपोर्ट मिळवल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला असून या प्रकरणी शेवगाव पोलीस ठाण्यात चार बांगलादेशी नागरिकांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली आहे.याप्रकरणी मिळालेल्या माहितीनुसार, क्षेत्रीय पासपोर्ट कार्यालय, पुणे यांनी २१ नोव्हेंबर रोजी अहिल्यानगर पोलीस अधीक्षक कार्यालयास पत्र पाठवून चार संशयित बांगलादेशी नागरिकांनी चुकीच्या पध्दतीने भारतीय पासपोर्ट मिळविल्याचा संशय व्यक्त केला होता.

# जनजागृती सप्ताहानिमित्त दोन शाळांमध्ये विशेष आरोग्य शिबिर

- सावरमाळ प्राथमिक आरोग्य केंद्रातर्फे जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांची सिकलसेल तपासणी
- आरोग्य विभागाचा पुढाकार

**मुखेड : (समर्थ गांवकरी)**

प्राथमिक आरोग्य केंद्र सावरमाळ अंतर्गत येणाऱ्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आणि श्री छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय सावरमाळ येथे 'सिकलसेल जनजागृती सप्ताहा' निमित्त विशेष तपासणी शिबिर उत्साहात पार पडले. या मोहिमेत एकूण १६५ विद्यार्थ्यांची सिकलसेल चाचणी करण्यात आली.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख आणि तालुका आरोग्य अधिकारी डॉ. आकाश देशमुख यांच्या



विशेष मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात आला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये सिकलसेल या अनुवांशिक आजाराबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि बाधितांचा शोध घेऊन त्यांना वेळेवर उपचार उपलब्ध करून देणे, हा या शिबिराचा मुख्य उद्देश होता.

या शिबिरात जिल्हा परिषद शाळा, सावरमाळ येथील ८६ लाभार्थी आणि श्री छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील ७९ लाभार्थी अशा एकूण १६५ विद्यार्थ्यांची रक्ततपासणी करण्यात आली.

याप्रसंगी सावरमाळ आरोग्य केंद्राचे प्रभारी वैद्यकीय अधिकारी डॉ. शेखरकुमार सोनटक्के व वैद्यकीय अधिकारी डॉ. सिद्धेश्वर धनमने यांनी सिकलसेल आजाराची लक्षणे आणि घ्यावयाची काळजी यावर मार्गदर्शन केले. श्रीमती सुषमा ढगे, परिचारिका यांनी विद्यार्थ्यांच्या प्राथमिक तपासणीत सहकार्य केले.

तपासणीची तांत्रिक जबाबदारी प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी श्री. अफरोज शेख आणि HLL प्रयोगशाळा तंत्रज्ञ श्री. ओंकार इंदोरे यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

आरोग्य सहाय्यक श्री. नामदेव उंदरे यांनी विद्यार्थ्यांची नोंदणी व मार्गदर्शन केले.

तसेच या मोहिमेच्या नियोजनासाठी रुग्णवाहिका चालक श्री. रामराव कुडदुले यांनी विशेष परिश्रम घेतले.

शालेय स्तरावर राबवण्यात आलेल्या या आरोग्य तपासणी मोहिमेचे शिक्षक, पालक आणि ग्रामस्थांकडून कौतुक होत आहे.

# शेतकऱ्याचा मुलगा आज सीमेवर देशाचे रक्षण करणार

**कुंडाणे ओ : (समर्थ गांवकरी)**

शेताच्या मळ्यात घाम गाळत मुलाला घडवणाऱ्या शेतकरी कुटुंबाचा अभिमान आज देशसेवेच्या गणवेशात उजळून निघाला आहे. कुंडाणे ओ येथील प्रगतीशील शेतकरी कुटुंबातील सुमीत देवरे यांची भारतीय सैन्यदलात निवड झाल्याने संपूर्ण गावात आनंद, अभिमान आणि देशभक्तीचा उत्साह ओसंडून वाहत आहे.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या लावण्यपूर्ण कार्यक्रमाच्या निमित्ताने गावच्या ग्रामपंचायतीच्या वतीने तसेच ग्रामस्थांच्या सहकार्याने सुमीत देवरे यांचा भव्य सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. तिरंग्याच्या साक्षीने शेतकरी पुत्राचा गौरव करताना अनेकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले.साध्या शेतकरी कुटुंबात जन्मलेला सुमीत,




मर्यादित साधनांमध्येही कठोर परिश्रम, शिस्त आणि देशप्रेम या मूल्यांवर घडला. रोजच्या शेतीच्या कामातून वेळ काढून केलेली तयारी, अपयशाला न घाबरता पुन्हा उभे राहण्याची जिद्द आणि "देशासाठी काहीतरी करायचं" ही मनातली आग—याच बळावर सुमीतने सैन्यदलाचे स्वप्न साकार केले.सत्कारप्रसंगी ग्रामपंचायत पदाधिकारी, ग्रामस्थ, युवक-युवती, शालेय विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. वक्त्यांनी सुमीतच्या संघर्षमय प्रवासाचा उल्लेख करत "आज सुमीतचा सन्मान म्हणजे संपूर्ण शेतकरी समाजाचा सन्मान" असल्याची भावना व्यक्त केली.

सुमीतच्या यशामुळे गावातील तरुणांना नवी प्रेरणा मिळे शेतात काम करुन देशसेवेसाठी काही तरी करण्याची जिद्द ही मोठी अभिमानाची गोष्ट आहे ग्रामपंचायत उपसरपंच रवींद्र आहेर

आपल्या भावना व्यक्त करताना सुमीत देवरे म्हणाले, "माझ्या आई-वडिलांचा कष्टांचा आशीर्वाद, गावकऱ्यांचे प्रेम आणि देशावरील निष्ठा यामुळेच आज हे शक्य झाले. देशसेवेची संधी मिळाल्याचा मला अभिमान आहे."

# कांदा लागवडीकडे शेतकऱ्यांचा कल

**वडाळा महादेव : (समर्थ गांवकरी)**

श्रीरामपुर तालुक्यातील वडाळा महादेव व परिसरात कांदा लागवडीला वेग आला असून यावर्षी प्रथमच कांदा लागवडीसाठी शेतकऱ्यांनी थेट यंत्राद्वारे कांदा लागवड सुरु केली असून या लागवडीस शेतकऱ्यांचा मोठा प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र या भागात दिसत आहे. दरवर्षी कांद्याची लागवड ही डिसेंबर व जानेवारी महिन्यात केली जाते. मात्र सर्वच शेतकऱ्यांची लागवड ही एकाचवेळी येत असल्याने मजुरांच्या मोठया टंचाईचा शेतकऱ्यांना सामना करावा लागत होता. मजुरही अव्वाच्या सव्वा मजूरी घेत. आधीच कमी भाव, त्यात मजुरांची टंचाई यामुळे शेतकरी वर्ग मोठया अडचणीत सापडला होता. यावर उपाय म्हणून गावातील होतकरु युवकांनी हे यंत्र खरेदी केले.

# ठाणे महापालिका निवडणुकीत युतीला भाजपचा विरोध

## सर्व भाजप मंडळ अध्यक्षांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

ठाणे महापालिका निवडणूक महायुतीत लढण्याची घोषणा शिवसेना ( शिंदे गट) आणि भाजपच्या नेत्यांनी जाहीर केली असली तरी ठाण्यात भाजप कार्यकर्त्यांमधून युती विरोधात विरोध दिसू लागला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कोपरी मतदार संघातील भाजप पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषद घेऊन विरोध दर्शविला असून स्वबळावर लढण्याचा आग्रह धरला आहे. परिणामी भाजपच्या स्थानिक नेत्यांसमोर बंड थोपविण्याचे मोठे आव्हान असणार आहे. मागील काही महिन्यांपासून ठाण्यात शिंदे शिवसेना आणि भाजप यांच्यात राजकीय संघर्ष सुरू होता. त्यामुळे आगामी महापालिका निवडणुकीत कार्यकर्त्यांनी थेट स्वबळाचा नारा देत दोन्ही पक्षांनी पदाधिकाऱ्यांना तयारीला लागण्याचे संकेत दिले होते. यामुळे अनेक नवे तसेच जुने इच्छुक पदाधिकाऱ्यांची मोर्चे बांधणी सुरु होती. ठाण्यासह राज्यातील इतर महापालिकांच्या निवडणुका महायुतीतच लढवण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. मंगळवारी ठाण्यात झालेल्या शिंदे सेनेच्या मेळाव्यात महायुतीचा नारा देण्यात आला होता. ठाण्यातील भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांकडून युतीला तीव्र विरोध होऊ लागला आहे. भाजप ठाण्यात स्वबळावर निवडणूक लढवण्यास पूर्णतः सक्षम आहे, असा ठाम दावा भाजप पदाधिकाऱ्यांनी यावेळी केला आहे.



ठाणे : ठाणे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर रणजित मोहन यादव (भा.प्र.से., २०२२ बॅच) यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांनी आज, दि. १८ डिसेंबर, २०२५ रोजी सकाळी कार्यालयीन वेळेत अधिकृतरीत्या पदभार स्वीकारला. यापूर्वी ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत असलेले रोहन घुगे (भा.प्र.से.) यांची बदली जिल्हाधिकारी, जळगाव या पदावर करण्यात आली होती. त्यांच्या बदलीनंतर जिल्हा परिषद पालघरचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांच्याकडे ठाणे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला होता. मनोज रानडे यांनी हा अतिरिक्त कार्यभार यशस्वीरीत्या सांभाळला. ( फोटो - संतोष पडवळ )

# सरसम बु येथील जि.प.शाळे मागील दलित वस्ती विकासापासून कोसो दूर

## ग्रामपंचायतचे अक्षम्य दुर्लक्ष

**हिमायतनगर : (समर्थ गांवकरी)**

हिमायतनगर तालुक्यातील मौजे सरसम बु.येथील जिल्हा परिषद शाळे मागील दलित वस्ती गेल्या अनेक वर्षा पासून विकासा पासून कोसो दूर आहे. या पंचवार्षिक कालावधीत कोणत्याही सरपंच, ग्रामसेवक तथा सदस्याने याकडे गांभीर्याने लक्ष दिले नसून कोणत्याही मुलभुत सोयी सुविधा पुरविल्या गेल्या नाहीत असा आरोप दलित वस्तीतील नागरिक करत आहेत.

याविषयी सविस्तर वृत्त असे की हिमायतनगर तालुक्यातील मौजे सरसम बु.हे गाव लोकसंख्येच्या मानाने मोठे असून दलित वस्ती मोठ्या प्रमाणात आहे. वार्ड क्रं १ मधील जिल्हा परिषद शाळेच्या मागील दलित वस्तीत मात्र गेल्या अनेक वर्षापासून विकासाची गंगा यायचे सोडून द्या पण विकास हा शब्द सुद्धा या वस्तीला दिसला ना ऐकू आला. नेहमीच सत्ताधारी सरपंच तथा सदस्यांनी या दलित वस्तीतील कुणाची तक्रार तर सोडा पण साधी फिर्याद देखील ऐकली नाही.या दलित वस्तीत आलेल्या रस्त्याची कामे काही सदस्यांनी आपल्या आका च्या मदतीने पळवून नेतात अन आपल्या घराकडे,आपल्या गल्लीत कामे करून घेतात ही या दलित वस्तीतील नागरिकांची कुचंबना नव्हे का ? इतकेच नाही तर रस्ता करण्यासाठी सहा ते सात ट्रॅक्टर दगड टाकूनही अजूनही कामाला सुरुवात नाही




की त्याचे नाव काढले जात नाही. आणि एक प्रतिष्ठित अन पदावर राहिलेला व्यक्ति म्हणतो की हा रस्ता झाला तर मी करून देणाऱ्याच्या घरी पाणी भरेल. म्हणजे एवढी यांची मानसिकता नीच बनलेली दिसून येत आहे.

उन्हाळ्यात सुद्धा याच दलित वस्तीत पाण्यासाठी सुविधा पुरविण्याच्या नावावर निधी उचलून फस्त करण्यात आला अन त्या निधीतून फक्त एक टाकी अन टाकी ठेवण्याचा स्टॅन्ड लावून ग्रामपंचायत मोकळी झाली.शेवटी पाणी अजूनही त्या टाकीत आले नाही अन पाणी मिळालेच नाही. या वस्तीतील बिचारे नागरिक पाण्यासाठी वणवण भटकंती करतच राहिले. यात भर म्हणजे याच वस्तीतील खांबावरील अनेक बल्प खराब झालेत यामुळे अनेक दिवसापासून लोकांना अंधारातच रहावे लागत आहे. याकडेही ग्रामपंचायत जाणूनबुजून दुर्लक्ष करत आहेत. गावागाड्यातील राजकारणामुळे ही दलित वस्ती मात्र पुरती पिचून गेली आहे अन इथल्या नागरिकांना वाटते की आम्ही सरसम गावात आहोतच की नाही ? की फक्त मतदानापुरता आमचा वापर केला जातो ? कोणतीच योजना व सुविधा ग्रामपंचायत पुरवत नसल्याने इथले नागरिक त्रस्त झाले आहेत.याच वार्डातून गावाच्या सरपंच निवडून आल्या पण त्यांनीही याकडे पाठ फिरवली असल्याचे दिसून आले.सरसम बु.ग्रामपंचायतचे सरपंच, ग्रामसेवक,उपसरपंच तथा सदस्यांनी या दलित वस्तीला विकासापासून वंचित ठेवण्याचा जणू चंगच केला आहे हे प्रकर्षाने दिसून येत आहे. यासाठी गटविकास अधिकारी यांनी या बाबीकडे गांभीर्याने लक्ष देऊन तात्काळ या दलित वस्तीतील विकासापासून वंचित राहिलेल्या नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी पुढाकार घेणे अपेक्षित आहे.लोकप्रतिनिधी आमदार, खासदार यांनीही या बाबीकडे लक्ष वेधून या दलित वस्तीतील नागरिकांना न्याय मिळवून देणे गरजेचे आहे.

# 'हाइट ऑफ डिप्लोमसी!

इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी आणि मोझाम्बिकचे राष्ट्रपती डॅनियल फ्रान्सिस्को चापो यांच्या एका भेटीची सोशल मीडियावर सध्या चांगलीच चर्चा रंगली आहे. इटलीतील पंतप्रधान कार्यालय ज्या पालाझ्रो किजी इथे आहे तिथे ही भेट झाली. सुमारे पाच फूट उंचीच्या जॉर्जिया मेलोनी आणि सुमारे सहा फूट आठ इंच उंचीचे चापो यांच्या भेटीत जॉर्जिया मेलोनी या विस्फारलेल्या डोळ्यांनी चापो यांच्याकडे पाहतानाचे फोटो सोशल मीडियावर प्रसिद्ध झाले. दोघांच्या उंचीतील फरकामुळे या फोटोवर प्रतिक्रियांचा पाऊस पडला. मेलोनी आणि चापो यांच्या उंचीमध्ये असलेल्या फरकामुळे त्या दोघांनाही एका फोटोफ्रेममध्ये बसवताना छायाचित्रकारांचीही तारांबळ उडाली. या भेटीला सोशल मीडियामध्ये 'हाइट ऑफ डिप्लोमसी' असेही संबोधण्यात येत आहे. जॉर्जिया मेलोनी यांनी चापो यांच्या स्वागतासाठी पुढे होताच त्यांच्याशी हस्तांदोलन करण्यापूर्वी आधी विस्फारलेल्या डोळ्यांनी मान वर करून त्यांच्याकडे पाहिले. त्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावर हास्य उमटले आणि मेलोनी यांच्या या दोन्ही मुद्रा कॅमेरामध्ये कैद झाल्या. त्यामुळे मेलोनी आणि चापो यांच्या भेटीचे हे फोटो व्हायरल झाले, यात काही नवल नाही.


डॅनियल फ्रान्सिस चापो यांनी २०२५ च्या सुरुवातीला मोझाम्बिकच्या राष्ट्रपतीपदाची सूत्रे स्वीकारली. त्यांच्या उंचीमुळे ते कुठेही जातात आणि कुणालाही



## संपादकीय

भेटतात, तेव्हा त्या भेटीची चर्चा होतेच. इटलीच्या अधिकृत दौऱ्यावर आल्यानंतर ते मेलोनी यांना भेटले, तेव्हाही त्याचीच पुनरावृत्ती झाली. या भेटीत इटली आणि मोझाम्बिक या दोन देशांमधील द्विपक्षीय संबंध अधिक मजबूत करणे, ऊर्जा, व्यापार, आर्थिक आणि राजनैतिक संबंध अशा अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा झाली.

जॉर्जिया मेलोनी या इटली आणि युरोपमधील एक अत्यंत प्रसिद्ध राजकीय नेत्या म्हणून ओळखल्या जातात. ऑक्टोबर २०२२ मध्ये त्यांनी इटलीच्या पंतप्रधानपदाची सूत्रे स्वीकारली. इटलीच्या पहिल्या महिला पंतप्रधान ठरण्याचा मान त्यांनी मिळवला आहे. त्यांच्या ठाम राजकीय भूमिकांमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर



त्या सातत्याने चर्चेत असतात. स्थलांतरितांबाबतचे धोरण, राष्ट्रीय हितसंबंध आणि युरोपियन राजकारणात त्या वेळोवेळी घेत असलेल्या भूमिका यामुळेही त्यांचे नाव अनेकदा आंतरराष्ट्रीय वृत्तमाध्यमांमध्ये झळकत असते.

भारतातही मेलोनी यांच्या चाहत्यांची संख्या मोठी आहे. त्या सोशल मीडियावर सक्रीय असतात. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नुकत्याच झालेल्या वाढदिवसानिमित्त मेलोनी यांनी त्यांना शुभेच्छा देणारा फोटो पोस्ट केला होता.

त्यात पंतप्रधान मोदी यांना 'सोर्स ऑफ इन्स्पिरेशन' म्हणून संबोधले होते. मेलोनी आणि पंतप्रधान मोदी यांच्या मैत्रीची चर्चा 'मीम्स' मधूनही सतत होत असते. त्यातूनच 'मेलोडी' हा हॅशटॅगही लोकप्रिय झालेला दिसतो.

## दै. समर्थ गांवकरी सूडोकू क्र. ६१

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 3 | | 2 | | 7 | | | 4 |
| 4 | | | | 3 | | 5 | | 2 |
| | | 2 | | 6 | 5 | | 8 | |
| | 6 | 8 | | | | | 4 | |
| | | | 3 | 4 | 6 | | | |
| | 5 | | | | | 9 | 3 | |
| | 1 | | 5 | 7 | | 3 | | |
| 5 | | 7 | | 8 | | | | 9 |
| 6 | | | 9 | | 1 | | 7 | |

उत्तर उद्याच्या अंकात

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेंन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

### सूडोकू क्र. ६० चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | 5 | 2 | 4 | 3 | 8 | 7 | 9 | 1 |
| 9 | 7 | 1 | 6 | 5 | 2 | 3 | 4 | 8 |
| 4 | 3 | 8 | 7 | 9 | 1 | 6 | 5 | 2 |
| 1 | 8 | 3 | 9 | 7 | 6 | 4 | 2 | 5 |
| 7 | 4 | 9 | 3 | 2 | 5 | 8 | 1 | 6 |
| 2 | 6 | 5 | 8 | 1 | 4 | 9 | 7 | 3 |
| 8 | 1 | 6 | 5 | 4 | 7 | 2 | 3 | 9 |
| 5 | 9 | 7 | 2 | 8 | 3 | 1 | 6 | 4 |
| 3 | 2 | 4 | 1 | 6 | 9 | 5 | 8 | 7 |

पंचांग
१९डिसेंबर२०२५
शुक्रवार
विक्रम संवत्- २०८२
मार्गशीर्ष शके
संवत्- १९४७

संवत्सर - विश्वावसूनाम
अयन- दक्षिणायान
मास- मार्गशीर्ष
ऋतु- सौर हेमंत
कृष्ण पक्ष
तिथि:अमावस्या

(अहोरात्र)
नक्षत्र:ज्येष्ठा २२:५१:०१
योग:शूल १५:४६:१६
करण:चतुष्पाद
१८:०८:०५
करण:नाग (अहोरात्र)

## उपदेशाचे डोस

### सर्वोत्कृष्ट भक्ती मार्ग

विद्वानांनुसार, ईश्वर प्राप्तीचे ३ मार्ग आहेत-ज्ञान, कर्म व भक्ती. खरंतर हेच ज्ञान आहे की, ज्या माध्यमातून ईश्वर कोण आहे? हे आपण जाणतो. ज्ञानाचा संग्रह आपल्या मेंदूत असतो व निर्विवादपणे हे आपणास ईश्वरकडूनच मिळते. मानवाचा मेंदू छोटा असतो मग अशा स्थितीत तो ईश्वराला कसा जाणू शकेल? हा प्रश्न निर्माण होतो. वास्तवात मेंदूत असलेल्या ज्ञानानेच हे शक्य होऊ शकते. ज्ञानामुळे मन तृप्त होते. श्रीआनंदमूर्तिके यांच्यानुसार, जोपर्यंत मानवात ज्ञानाची जाणीव राहिल तोपर्यंत त्याने ज्ञान ग्रहण करत राहिले पाहिजे. एका मर्यादेनंतर आपल्या ज्ञानाची भूक मंदावते कारण तोपर्यंत आपले लक्ष्य ईश्वर प्राप्ती होते.काही विद्वान मानतात की, कर्मामुळे ईश्वर प्राप्ती होते कारण कर्म न करता मनुष्य एक क्षण सुद्धा जिवंत राहू शकत नाही. म्हणून आपण कर्म करत राहिले पाहिजे पण कर्म चांगले असायला हवेत. गीतेत प्रभू श्रीकृष्णाने मानवास कुठल्याही फळाची अपेक्षा न करता कर्म करत राहण्याचा सल्ला दिला आहे. सांगण्याचे तात्पर्य धार्मिक व आध्यात्मिक जगात ज्ञानाला जेवढी किंमत आहे त्यापेक्षा कमी कर्माची नाही. विद्वान म्हणतात की, जर निर्मळ भावाने ईश्वराची भक्ती केली तर ते सहज मिळतील. खरंतर भक्ती मार्गाची कास मोठ-मोठ्या ज्ञानवंतांनी चोखाळली आहे. आपण सर्व मानतो की, सृष्टीची निर्मिती ईश्वरानेच केली आहे. म्हणून जगातील प्रत्येक जीव परमात्म्याचे संतान आहे. जर आपण परमात्माला प्रसन्न करु इच्छित असाल तर त्यांची संतान म्हणजे प्रत्येक जीवप्रती प्रेम-भाव ठेवा व यासाठी आपण मानवसेवा व समाजसेवा केली पाहिजे तसेच निराधारांना आधार दिला पाहिजे. मानवसेवा करताना आपण नेहमी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, हा सर्व खटाटोप ईश्वर प्राप्तीसाठी केला जात आहे. खरंतर हीच भक्ती आहे. त्यामागे दुसरे कुठलेही कारण नाही. जर भक्तीभाव निर्माण झाला तर ईश्वर प्राप्तीचा मार्ग मिळाला, असे समजा.

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १४५४- दुसरा हेनरी राजा बनला. त्याचे मतभेद असलेल्या थॉमस बेकेत या आर्जभिशप ऑफ कँटरबरीचा त्याने खून करविला.
- १९०५- अत्यवस्थ रुग्णांना रुग्णालयात नेण्यासाठी लंडनमध्ये पहिली रुग्णवाहिका सेवा सुरू करण्यात आली.
- १९४३- रशियांत खारकोव्ह येथे तीन जर्मनवंशी रशियनांना देशविरोधी कारवाया केल्याबद्दल फाशी दिली.
- २००६- श्रीलंकेत लिट्टे बंडखोरांनी २३ विद्यार्थ्यांचे अपहरण केले.

### राष्ट्रीय

- १९०९ - महात्मा गांधी दक्षिण अफ्रिकेतून भारतात परतले.
- १९६१ - भारतीय सैन्याने गोवा मुक्त केला. पोर्तुगीज झेंडा खाली उतरला.
- २००७ - उपराष्ट्रपती मोहम्मद हमीद अन्सारी यांनी आऊटलुक या नियतकालिकाला एक्सलन्स इन जर्नालिझम-२००७ हा पुरस्कार प्रदान केला.


### जन्म

- १९३४ - प्रतिभा देवीसिंग पाटील, भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती.
- १९४७- गजानन भास्कर मेहेंदळे, इतिहास संशोधक व शिवचित्रकार.

### निधन

- १८४८- वदरिंग हाइट्सची लेखिका ऐमिली ब्रंटिचा मृत्यू.
- १८५१- जे.एम. डब्ल्यु टर्नर या चित्रकाराचा मृत्यू. लँडस्केप आर्टिस्ट म्हणून तो खूप प्रसिद्ध होता.
- १८८०- फ्रँक बकलंड या प्राणिशास्त्रज्ञाचे निधन. त्यांनी स्वत- अनेक प्राणी पाळूत त्यांचा अभ्यास केला.

## दै. समर्थ गांवकरी जम्बो शब्दकोडे क्र. ६१



### आडवे शब्द

१. लग्नकार्यातून हद्दपार झालेली भोजनाची पद्धत
३. कुटुंबातील राजकारण शिजायचे ती खोली
६. निर्णय
८. कुंतीचा धनुर्धारी पुत्र
१०. श्री गणेशाचे एक नाव
१२. एक लाल रत्न
१३. फसवणूक
१५. प्रफुल्लित
१७. पाण्याचा प्रवाह, पात्याची तीक्ष्णता
१८. पहारेकरी
२०. दुलई
२२. होकारच्या विरुद्ध
२४. सारखा
२५. सरस्वतीचे एक नाव
२८. नवेपणा
२९. फायदा तोटा
३२. हळू, शांत
३४. पायी भटकणे
३६. खाण्याची अनावर इच्छा
३९. अद्भू, अतर्क्य
४१. कापडाला गेलेली चीर
४२. पावलोपावली
४४. पहिली रास
४५. कवडीमोल
४७. भीती, ४८. मध
५०. प्रेम, धन, कापड शिवताना कडेला सोडलेली मोकळी जागा
५१. सापाने टाकलेली त्वचा
५२. वडिलांचा भाऊ
५३. विशेष
५४. कठीण आवरण
५५. रात्रीच्या पाऊस
५८. पहाटे म्हणण्याचा संगीतातील राग
५९. हात, ६२. चरचरीत, खडबडीत
६५. जळलेला
६७. वागणूक
६८. पुन्हा
७०. मेहनत, कष्ट
७३. चौक
७४. अखेरीस
७७. मिजास, डौल, दिमाख
७८. जीव
७९. दर्पण
८०. गृहीतकातील दुसरा शब्द
८१. थाळी
८२. दुबळी, गरीब

### उभे शब्द

१. प्रधानमंत्री
२. बिनवासाचे पांढरे फूल
३. प्रतिष्ठा, एक अवयव
४. राष्ट्रगीताची सुरुवात
५. रमापती, ६. जवळ
७. नस्ती सलगी
८. इतर
९. आश्चर्याची गोष्ट
११. येणाराच्या विरुद्ध
१४. चंद्र
१६. आशीर्वाद
१९. सुगंधी गवताचे मूळ
२१. एक मिश्र धातू
२३. सूर्याचे एक नाव
२५. भाजी
२६. सर्वात खालचे पाताळ
२७. वार्तालाप
३०. माखणे
३१. जबर, सडेतोड, खणखणीत
३२. राग, क्रोध
३३. दिशारक्षक देवता
३४. मातीचा दिवा
३५. आमिषादाखल चाटवण्याचा पदार्थ
३६. मृतिका पात्र
३७. जाडाभरडा कापड प्रकार
३८. न दबणारे, कडक
३९. जहर
४०. माफी मागणारा
४३. नावडता
४४. चरबी
४६. गजऱ्याचे सुगंधी पांढरे फूल
४८. चर्चा
४९. रंगविलेले
५०. भ्रम, जादू
५१. लबाडीचा हेतू
५२. अंधार
५४. ललाट
५६. तळे, सरोवर
५७. महिरप
६०. रथाची मिरवणूक
६१. लोकसंख्येची मोजणी
६३. चापट, मऊ पदार्थाचा आघात
६४. पद्धतीप्रमाणे
६५. पशु
६६. शरीर
६९. दळण्याचे दगडी जोड साधन
७१. संतापी
७२. त्रास
७३. धातूचे चलन
७५. पृथ्वी
७६. धान्य पिकवणारी जमीन

### शब्दकोडे क्र. ६० चे उत्तर

आडवे उत्तर : १.विषवल्ली ३.तप ५.कसाबसा ८.नर्मदा १०.हवालदार १२.रोखठोक १३.हकालपट्टी १५.टर १६.खबर १७.जर १८.कण १९.खेटर २०.कारण २२.श्वापद २३.कळप २४.दशरथ २५.नासका २६.समास २८.टपाल ३१.काना ३२.रखवालदार ३५.वादक ३७.घर ३८.सविता ४०.पल ४१.रमण ४२.ललकारणे ४३.धडक ४७.जयजयकार ५०.लागीर ५१.जवळजवळ ५४.पाक ५६.वेग ५७.रजनी ५९.तया ६२.गज ६४.दमादमाने ६५.आवरण ६६.मटामटा ६७.सजग ६८.वारू ७०.भारी ७१.वाटमारी ७२.बारीकसारीक ७३.सोने

उभे उत्तर : २.षटकार ३.तवा ४.पलटण ५.कर ६.बरोबर ७.साखर ८.नकलाकार ९.दाणादाण १०.हट्टी ११.दार १३.हजर १४.परोपकार १६.खटपट १९.खेळ २१.रथ २२.श्वास २३.कसदार २४.दलदल २५.नानाविध २६.सवाल २७.माल २९.पावा ३०.घोरणे ३१.कास ३३.खप ३४.रमणीय ३६.कलकलाट ३७.घरघर ३९.ताडगूळ ४४.साय ४५.हरकत ४६.सांजवेळ ४७.जळजळ ४८.जथा ४९.कापा ५२.वग ५३.वर ५५.आमनेसामने ५८.थट्टामस्करी ६०.यादव ६१.पादचारी ६२.गवगवा ६३.जर ६५.आज ६६.मरू ६७.सप्त ६८.वारी ६९.फासा ७०.भाक

# श्रीमती पार्वती डहाणुकर कन्या विद्यालय : स्नेहसंमेलन उत्साहात

## स्नेहसंमेलन विद्यार्थ्यांसाठी सांस्कृतिक पर्वणीच आहे - अमित मुथ्था

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

स्नेहसंमेलनामूळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो. स्नेहसंमेलन विद्यार्थ्यांसाठी पर्वणीच आहे. शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध गुण दर्शन कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला आहे.तसेच अभ्यासासोबतच विविध उपक्रमात सहभागी होऊन विद्यार्थ्यांनी नावलौकिक मिळविला आहे.शाळेतील विद्यार्थ्यांची प्रगती कौतुकास्पद आहे.असे प्रतिपादन मर्चंटस बँकेचे चेअरमन अमित मुथ्था यांनी केले आहे. हिंद सेवा मंडळाचे श्रीमती पार्वतीबाई डहाणूकर कन्या विद्यालयाचे वार्षिक पारितोषिक वितरण व विविध गुणदर्शन कार्यक्रम उत्साहात साजरे झाले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष हिंदसेवा मंडळाचे कार्यकारणी सदस्य रणजीत




श्रीगोड,प्रमुख पाहुणे मर्चंट बँकेचे चेअरमन अमित मुथ्था,हिंद सेवा मंडळाचे माजी अध्यक्ष मधुसूदन मुळे,ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, श्रीमती पा.ड.क.वी.शाळेचे चेअरमन सुजित बेडेकर, कार्यकारणी सदस्य जगदीश झालानी,प्रा.ज्योती कुलकर्णी, माजी मुख्याध्यापक संजय मुदगल,शालेय समिती सदस्य डॉ.विजयकुमार भंडारी,शैलेंद्र गांधी,अँड.सायली खराडे, विद्यार्थिनी प्रतिनिधी पठाण हुमेरा, ह. सा. शिंदे, मुख्याध्यापक सर्व श्री अशोक डोळसे,सुनील सुसरे,विठ्ठल उरमुडे, सुभाष येवले, मुख्याध्यापिका सौ.रोहिणी फळे, श्रीमती कवडे मॅडम, शिक्षक प्रतिनिधी वैशाली दारवेकर,शिक्षकेतर प्रतिनिधी गायत्री कुलकर्णी आदींसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अजित बोरा म्हणाले,शाळेचा दहावीचा निकाल ९३ टक्के लागला आहे.ज्या विद्यार्थ्यांना बक्षीस मिळाले आहेत त्यांचे अभिनंदन तसेच ज्या विद्यार्थ्यांना पारितोषिके मिळाली नाही त्यांनी पुढील वर्षी स्पर्धेत सहभागी होऊन विजेते व्हावे. स्नेहसंमेलनात मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी झाले आहेत. मधुसूदन मुळे म्हणाले, शाळेतील विद्यार्थ्यांनी सर्व स्पर्धेत सहभाग नोंदवावा. चांगला अभ्यास करून शाळेचे व पालकांचे नाव उज्वल होईल यासाठी प्रयत्न करावा. विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळावे यासाठी हिंदसेवा मंडळ सदैव प्रयत्नशील असते. शाळेतील विद्यार्थिनींनी महाराष्ट्राची लोकधारा,भारुड, पारंपरिक लोकगीते,कोळीगीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली.नांगरे सुखदेव यांना आदर्श शिक्षक व कु.बोरगावकर चैत्वीलाआदर्श विद्यार्थिनी म्हणून गौरविण्यात आले. मुख्याध्यापिका सौ.रोहिणी फळे यांनी वार्षिक अहवालाचे वाचन केले.

# 'केएसएच ग्रुप'ला 'ग्रेट प्लेस टू वर्क' प्रमाणपत्र

- लोक आणि संस्कृतीप्रति ५०हून अधिक वर्षांच्या वचनबद्धतेवर शिक्कामोर्तब



**पुणे: (समर्थ गांवकरी)**

पुरवठा साखळी (सप्लाय चेन) उद्योगात मजबूत स्थितीत कार्यरत असलेल्या, वैविध्यपूर्ण व्यवसायातील आघाडीच्या 'केएसएच ग्रुप'ने भारतातील अत्यंत प्रतिष्ठेच्या 'ग्रेट प्लेस टू वर्क (जीपीटीडब्ल्यू) प्रमाणपत्र मिळाल्याची घोषणा नुकताच केली. या प्रमाणपत्रात केएसएच इंटिग्रेटेड लॉजिस्टिक्स, केएसएच डिस्ट्रीपार्क्स आणि केएसएच इन्फ्रा आदी त्यांच्या तीनही मुख्य लॉजिस्टिक्स संस्थांचा समावेश आहे.

'ग्रेट प्लेस टू वर्क' (जीपीटीजब्ल्यू) असे या पुरस्काराचे अधिकृत नाव असून हा पुरस्कार जारी करणारी संस्थाही 'ग्रेट प्लेस टू वर्क' आहे. हा प्रतिष्ठेचा सन्मान कर्मचारी सर्वेक्षणातून (सर्टिफिकेशन सर्वे) मिळालेल्या कठोर अभिप्राय आणि केएसएच ग्रुपने भारतात 'ग्रेट प्लेस टू वर्क सर्टिफाइड होण्यासाठी आवश्यक निकष पूर्ण केल्याची पुष्टी यावर आधारित आहे.


'केएसएच ग्रुप' संस्थेने जीपीटीडब्ल्यू (ग्रेट प्लेस टू वर्क) प्रमाणपत्र मिळवले, कारण त्यांनी एकत्रितपणे एक मजबूत संस्कृती निर्माण केली, ही एक अशी संस्कृती आहे, ज्यात विश्वासार्हता, आदर, काळजी आणि कर्मचाऱ्यांबद्दल अभिमान आहे. 'केएसएच ग्रुप' मध्ये कामाच्या ठिकाणी मोकळेपणाने बोलता येते, सगळ्यांना सारखी वागणूक मिळते, प्रत्येक कर्मचाऱ्याला आपण महत्त्वाचे आहोत असे वाटते, सगळेजण एकमेकांना सहभागी करून घेतात आणि आपल्या कामासाठी पूर्ण पाठिंबा मिळतो जेणेकरून ते त्यांचे सर्वोत्तम काम करू शकतील.

कंपनीचा ५०हून अधिक वर्षांचा वारसा सचोटी, ग्राहक-केंद्रितता, कार्यात्मक उत्कृष्टता आणि लोकांप्रति असलेल्या खोल बांधिलकीच्या मूल्यांवर आधारित आहे.

# कॅमेऱ्यासमोरची आवड : 'सरू'च्या सेटवर मोहकचा नृत्य अनुभव

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

'झी टीव्ही'वरील 'सरू' या मालिकेत मुख्य भूमिका साकारताना आलेला अनुभव अभिनेत्री मोहक मटकरने सांगितला. तिच्यासाठी हा फक्त एक व्यक्तिरेखा साकारण्याचा प्रवास नव्हता, तर आत्मशोध, भावनिक नाते आणि सांस्कृतिक अनुभवाची सफर होती. सेटवरील आठवणींना उजाळा देताना मोहकने एका खास नृत्याच्या दृश्याबद्दल सांगितले आणि ती जुन्या आठवणींमध्ये रमली. शास्त्रीय नृत्यात प्रशिक्षित असलेल्या मोहकने उत्साहाने शास्त्रीय नृत्यशैलींपेक्षा पूर्णपणे वेगळा असलेल्या 'कठपुतळी' या लोकनृत्य प्रकाराचे शिक्षण घेतले. या प्रक्रियेबद्दल बोलताना मोहक म्हणाली की हा अनुभव "आव्हानात्मक पण समृद्ध करणारा" होता आणि यामुळे ती



केवळ कलाकार म्हणूनच नव्हे तर भारताच्या विविध सांस्कृतिक वारशाची जाण असलेली कलावंत म्हणूनही अधिक विकसित झाली. मोहक म्हणाली, "मी शास्त्रीय नृत्यात प्रशिक्षित असल्याने 'कठपुतळी' या लोकनृत्य प्रकार शिकण्याचे आव्हान मी आनंदाने स्वीकारले. हा नृत्यप्रकार अत्यंत वेगळा असून त्यात नाजूक हातवारे, भावपूर्ण कथाकथन, लयबद्ध हालचाली आणि वारशाशी आत्मीय नाते आवश्यक असते. कठपुतळीतील हातवारे आणि कथाकथनाच्या अभिव्यक्ती पारंपरिक बाहुल्यांच्या हालचालींची नक्कल करतात, ज्यासाठी अनेक तासांचा सराव, समर्पण आणि शिस्त लागते." ती पुढे म्हणाली, "हा प्रवास कठीण होता कारण सूक्ष्म हालचाली, बाहुलीसारख्या भावभावना आणि हालचालींचा प्रवाह आत्मसात करण्यासाठी खूप मेहनत घ्यावी लागली. तरीही प्रत्येक रिहर्सलसोबत मी नृत्याशीच नव्हे तर 'सरू'च्या मुळांशी अधिक जोडली गेले. या प्रक्रियेमुळे मी माझ्या सोयीच्या चौकटीबाहेर आले, पण त्याच वेळी एका सुंदर गोष्टीत रुजले. माझ्यासाठी हे नृत्यदृश्य फक्त कोरिओग्राफी नव्हते, तर संस्कृतीला आदरांजली, सरूच्या ओळखीची खिडकी आणि माझ्या आवडी व पात्राच्या प्रवासामधील पूल होता.

# कारवाईची टांगती तलावर

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

बिलोली तालुक्यातील मौ. अर्जापूर येथील ग्रामपंचायत अंतर्गत दलित वस्ती सीसी रस्ता प्रकरण, सरपंच सिद्धार्थ नागोराव पतंगे व तत्कालीन ग्रासेवक सतिष बालचंद फुलारी यांनी संगनमत करून तब्बल १० लक्ष रुपयाच्या सीसी रस्त्याचे बांधकाम दलित वस्ती सोडून इतरत्र करून दलित समाजावर अन्याय केल्या याबाबत ग्रा.पं. सदस्य साईनाथ शेट्टीवार यांनी संबंधित विभागाकडे तक्रारी केली,पण त्याबद्दल अद्याप कारवाई होत नसल्याने शेट्टीवार यांनी न्यायालयात धाव घेऊन सरपंच, ग्रामसेवका विरुद्ध कारवाई करून गुन्हा दाखल करण्यासाठी याचिका दाखल केली आहे. यावर आतापर्यंत चार सुनावण्या झाल्या असून पुढील सुनावणी १ जानेवारी २०२६ ठेवण्यात आली आहे.

# हॉटेल कावेरीवर गोळीबार, हॉटेल मालक गंभीर जखमी

## जुना वाद कारणीभूत; ७ ते ८ जणांच्या टोळीचा हल्ला, दोन संशयितांची नावे निष्पन्न

**जामखेड : (समर्थ गांवकरी)**

जामखेड–बीड रोडवरील हॉटेल कावेरी येथे बुधवारी मध्यरात्री थरारक घटना घडली. सात ते आठ जणांच्या टोळीने हॉटेलवर हल्ला करत तोडफोड केली तसेच गोळीबार केला. या घटनेत हॉटेल मालक रोहीत अनिल पवार (वय २७, रा. कान्होपात्रा नगर, जामखेड) हे गंभीर जखमी झाले आहेत.पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, रोहीत पवार हे रात्री हॉटेलवर गिऱ्हाईक पाहत असताना सुमारे रात्री बारा वाजण्याच्या सुमारास आरोपींची टोळी हॉटेलवर आली. आरोपींनी हॉटेलची तोडफोड करत रोहीत पवार यांच्यावर गोळीबार केला. या गोळीबारात त्यांच्या पायाला गोळी लागली असून ते गंभीर जखमी झाले आहेत. हल्ल्यानंतर




आरोपींनी हॉटेल मालकाची चारचाकी गाडीही फोडली असून गाडीचे मोठे नुकसान झाले आहे.

घटनेनंतर जखमी रोहीत पवार यांना तातडीने पुढील उपचारासाठी अहिल्यानगर (नगर) येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता दोन संशयितांची नावे निष्पन्न झाली आहेत. मागील भांडणाच्या कारणावरून हा गोळीबार झाल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. घटनास्थळी अहिल्यानगर येथील फॉरेन्सिक पथक दाखल झाले असून गावठी कट्ट्याचे अवशेष सापडले आहेत. या प्रकरणी जामखेड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून उर्वरित आरोपींचा शोध पोलिसांकडून सुरू आहे.

घटनेची माहिती मिळताच अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रविणचंद लोखंडे तसेच जामखेड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

# विवरा येथील युवकाचा मृत्यू की हत्या आत्महत्या?

## नातेवाईकांचा घातपाताचा आरोप; कारवाईच्या मागणीसाठी दोन तास ठिय्या आंदोलन

**रावेर : (समर्थ गांवकरी)**

रावेर तालुक्यातील विवरा खुर्द येथील युवकाचा भुसावळ येथील तापी नदीत संशयास्पद मृत्यू झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. हितेश सुनील पाटील (वय २१) हा युवक जळगाव येथे डिप्लोमा शिक्षण घेत होता. गेल्या चार ते पाच दिवसांपासून तो घरातून कुणालाही न सांगता बेपत्ता झाला होता.

रविवारी (दि.14) हितेशची दुचाकी भुसावळ येथील तापी नदी पुलावर आढळून आली होती. यासंदर्भात भुसावळ शहर पोलीस ठाण्यात हरवल्याची नोंद करण्यात आली होती. मात्र आज (दि.17) सकाळी सुमारे ११ वाजता स्थानिक मच्छीमारांना तापी नदीत तरंगताना युवकाचा मृतदेह आढळून आला. ही बाब समजताच पोलीस प्रशासनाने घटनास्थळी



धाव घेत मृतदेह ताब्यात घेतला.

मृतदेहाचे शवविच्छेदन झाल्यानंतर नातेवाईकांनी हा मृत्यू आत्महत्या नसून घातपाताचा असल्याचा आरोप करत संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली. "जोपर्यंत या घटनेमागील सूत्रधार कोण आहे आणि कुणी हत्या केली आहे याचा सखोल तपास होत नाही, तोपर्यंत आम्ही मृतदेह ताब्यात घेणार नाही," अशी ठाम भूमिका नातेवाईकांनी घेतली.

या मागणीसाठी नातेवाईक व मित्रपरिवाराने निंभोरा पोलीस ठाण्यात मृतदेह सुमारे एक ते दीड तास ठेवून ठिय्या आंदोलन केले. विवरा गावातील नागरिकही मोठ्या संख्येने पोलीस ठाण्यात जमा झाले असून वातावरण अत्यंत तणावपूर्ण बनले होते. संबंधित दोषींवर तातडीने गुन्हा दाखल करून अटक करण्यात यावी, अशी जोरदार मागणी आंदोलकांकडून करण्यात येत होती. दरम्यान, सावदा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल पाटील तसेच निंभोरा पोलीस ठाण्याचे अधिकारी हरिदास बोचरे यांनी घटनास्थळी येऊन नातेवाईक व जमावाची समजूत काढली. सखोल तपास करण्यात येईल, असे आश्वासन दिल्यानंतर सुमारे दोन तासांनी आंदोलन मागे घेण्यात आले.

त्यानंतर शोकाकुल वातावरणात विवरा येथे मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यात आले. दरम्यान, या घटनेचा तपास पोलीसांकडून सुरू असून हा मृत्यू आत्महत्या की हत्या, याबाबतचा सत्य शोधण्यासाठी सर्व बाजूंनी चौकशी केली जात असल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले.

# समन्वयक पदी डॉ. मीनल पाटील

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

दि.१८ डिसेंबर रोजी राष्ट्रवादी कांग्रेस जिल्हा कमिटीची बैठक पारपडली यादरम्यान राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या जिल्हा समन्वयक पदी युवा नेत्या डॉ. मीनल पाटील खतगावकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नगर परिषद निवडणूकीनंतर लगेचच महानगरपालिकेच्या निवडणूका जाहीर झाल्या आहेत आणि येणा-या नजीकच्या काळात जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूका जाहीर होणार आहेत. त्याअनुषंगाने नांदेड जिल्ह्यात समन्वयाची जवाबदारी पार पाडण्यासाठी राष्ट्रवादीच्या वरिष्ठ नेत्यांनी जिल्हा समन्वयक म्हणुन डॉ. मीनल पाटील खतगावकर, प्रदेश सरचिटणीस म्हणुन भास्कर भिलवंडे आणि नांदेड जिल्हा ग्रामीण दक्षिणच्या जिल्हा कार्याध्यक्षपदी अशोक पाटील मुगावकर व नांदेड शहर जिल्हा कार्याध्यक्ष पदी माजी उपमहापौर स. सरजीतसिंग गील यांची नियुक्ती केली आहे.

# संजय देशमुख व रोहीत मुठे यांचा सन्मान

**राजूर: (समर्थ गांवकरी)**

मुंबई असोसिएट एनसीसी ऑफिसर वेल्फेअर बोर्ड, महाराष्ट्र राज्य यांच्या पुढाकाराने राष्ट्रीय छात्र सेना अधिकारी सन्मान सोहळा नुकताच कुर्ला,मुंबई येथे दिमाखात संपन्न झाला.हा सोहळा ब्रिगेडिअर शिरीष ढोबळे, कॅप्टन मनोज भामरे,कॅप्टन आशिष दामले, मिस सुमनसिंग यांच्या हस्ते दिमाखात पार पडला. एनसीसीच्या माध्यमातून तरुण पिढीला शिस्तबद्ध, जबाबदार व देशप्रेमी घडवणाऱ्या अधिकारी वर्गाच्या कार्याचा गौरव करण्यासाठी या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी या

कार्यक्रमात राजूर येथील सत्यनिकेतन संस्थेचे गुरुवर्य रा.वि. पाटणकर सर्वोदय विद्या मंदिर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे शिक्षक फर्स्ट ऑफिसर संजय रामचंद्र देशमुख तसेच अॅड.मनोहरराव नानासाहेब



देशमुख महाविद्यालयाचे प्रा.कॅप्टन रोहित मुठे यांना राज्यस्तरीय बेस्ट एनसीसी ऑफिसर अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले.

विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुणआत्मविश्वास, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रभक्ती रुजवण्याचे कार्य एनसीसी अधिकारी करत असल्याचे यावेळी मान्यवरांनी सांगितले. एनसीसी अधिकारी, कॅडेट्स आणि नागरिकांच्या मोठ्या उपस्थितीत हा सन्मान सोहळा प्रेरणादायी आणि उत्साही वातावरणात यशस्वीरीत्या संपन्न झाला. यानिमित्ताने संजय देशमुख तसेच रोहीत मुठे यांचे सर्वत्र कौतुक होत असून सत्यनिकेतन संस्थेचे अध्यक्ष अॅड.मनोहरराव देशमुख,सचिव एम.एल.मुठे,कोषाध्यक्ष विवेकजी मदन,माजी सचिव टी.एन. कानवडे,संचालक मिलिंदशेठ उमराणी,प्रकाश टाकळकर,विजय पवार, एस.टी.येलमामे, श्रीराम पन्हाळे,विलासराव नवले,प्रकाश महाले यांसह प्राचार्य डॉ.भाऊसाहेब देशमुख,प्राचार्य भाऊसाहेब बनकर,मधुकर मोखरे, उपप्राचार्य दिपक बुऱ्हाडे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी,पालक आदिंनी अभिनंदन केले आहे. तसेच भावी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# अनुराधा नांदेडकरांच्या लावण्यवतींचा सराव सुरू

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

दर वर्षा प्रमाणे याही वर्षी महाराष्ट्राच्या लोककलेचा सन्मान करण्याच्या उद्देशाने नांदेड जिल्ह्यातील माळेगावच्या लावणी महोत्सवाची सुरवात दि.२२ डिसेंबर रोजी होणार आहे. या वेळी महाराष्ट्रातील नामवंत लावणी संचाचा समावेश होणार असून यामध्ये पुरस्कार प्राप्त प्रेम कुमार मस्के व अनुराधा नांदेडकर यांच्या लावणी संचाचा समावेश करण्यात आला आहे. सदर लावणी महोत्सवास अनुसरून विविध नृत्यागंनाच्या उपस्थितीत पिढ्यानपिढ्या मराठी माणसाच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या लावणीच्या घुंगराचा नाद रसिकांच्या कानी घुमवण्यासाठी गायीका अनुराधा नांदेडकर यांच्या लावणी संचाचा सराव सुरू झाला आहे.या संचात प्रामुख्याने अल्का पुणेकर,पूर्वा पुणेकर,अंजली



संभाजीनगरकर,श्रुती संभाजीनगरकर या विशिष्ठ लावण्यवतीसह नृत्यांगणा आपली कला सादर करणार आहेत.याबाबत या संचाच्या गायीका अनुराधा नांदेडकर म्हणाल्या की,महाराष्ट्रातील माळेगाव महोत्सवासाठी प्रशासनाने पाचारण केलेल्या लावणी संचात गेल्या कांही वर्षा पासून नांदेडला संधी देण्यात येत असून यामध्ये नांदेडकरांची मान उंचावेल अशीच लावणी सादर करणार असे म्हणाल्या.

# श्री स्वामी समर्थ गुरुपीठाच्या तालुका प्रतिनिधीपदी एकनाथ खिलारी यांची नियुक्ती

## साई सेवा सामाजिक संघर्ष प्रतिष्ठानच्यावतीने सुनील त्र्यंबके यांच्या हस्ते सत्कार



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ, श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक अंतर्गत कार्यरत प्रधान न्यासाच्या वतीने अहिल्यानगर तालुक्याचे तालुका प्रतिनिधी म्हणून श्री.एकनाथ खिलारी यांची पुढील गुरुपौर्णिमा २०२६ पर्यंत नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीबद्दल साई सेवा संघर्ष प्रतिष्ठानच्या वतीने नगरसेवक सुनील त्र्यंबके यांच्या हस्ते श्री.खिलारी यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी तपोवन केंद्र प्रतिनिधी सोनाली पालवे, बबन पालवे, भाऊसाहेब देशमाने, शुभांगी पाटील, महादेव शिरसाठ, निवृत्ती भांगे, सुभाष निंबाळकर, राजु शिंपणकर, देविदास डहाळे, सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ, ता. त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक (रजि. नं. एफ-७६५५/नाशिक – दिंडोरी प्रणित) या प्रधान न्यासाच्या आचारसंहितेनुसार ही नियुक्ती करण्यात आली आहे. श्री गुरुपीठ, त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या दरमहा मासिक महासभेस उपस्थित राहणे, प.पू. गुरुमाऊलींच्या मार्गदर्शनानुसार तालुकानिहाय सर्व केंद्रांशी संपर्क ठेवून कार्य करणे, तसेच सर्व केंद्रांवरील अध्यात्मिक सेवा कार्यरत ठेवणे ही जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

तसेच तालुकानिहाय केंद्रांच्या अध्यात्मिक सेवेचा व आर्थिक हिशोबाचा जमा-खर्च अहवाल नियमितपणे श्री गुरुपीठ येथे सादर करणे व सर्व कामकाज दिंडोरी दरबार, श्री गुरुपीठ यांच्या अधीन राहून पार पाडणे, असे निर्देश नियुक्तीपत्राद्वारे देण्यात आले आहेत. स्वामी समर्थ महाराजांच्या इच्छेत इच्छा मिळून राहून महाराजांना भूषणावह ठरेल असे आचरण ठेवण्याचेही आवाहन करण्यात आले.

यावेळी सत्कार प्रसंगी बोलताना नगरसेवक सुनील त्र्यंबके म्हणाले की, "श्री.एकनाथ खिलारी हे दीर्घकाळापासून धार्मिक व सामाजिक कार्यात सक्रिय असून सेवाभाव, शिस्त आणि निष्ठेमुळेच त्यांची तालुका प्रतिनिधीपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या माध्यमातून अहिल्यानगर तालुक्यात गुरुपीठाचे कार्य अधिक व्यापक स्वरूपात पोहोचेल," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी आपल्या सन्मानाला उत्तर देताना श्री. एकनाथ खिलारी म्हणाले की, "प.पू. गुरुमाऊलींच्या आशीर्वादाने मिळालेली ही जबाबदारी मी पूर्ण निष्ठेने पार पाडेन. गुरुपीठाच्या आचारसंहितेचे काटेकोर पालन करून तालुक्यातील सर्व केंद्रांवरील अध्यात्मिक सेवा अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी प्रयत्नशील राहीन. स्वामी समर्थ महाराजांच्या कृपेने गुरुपीठाचे कार्य भक्तांपर्यंत पोहोचविणे हेच माझे ध्येय राहील," असे खिलारी यांनी सांगितले. शेवटी अभिषेक खिलारी यांनी सर्वांचे आभार मानले.